cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–९८ सोमवार दि.२९ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

हा आर्थिक दहशतवाद?

सध्या उत्तर प्रदेशमधील प्रसिद्ध कावड यात्रा विशेष चर्चेत आहे. या यात्रा मार्गावरील दुकानदारांनी आपली ओळख दुकानाच्या पाटीवर दर्शवावी असा आदेश उत्तर प्रदेश सरकारने काढला आणि वादाला सुरुवात झाली. प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या निर्णयाला सुरुवातीला स्थगिती दिली. परंतु उत्तर प्रदेश सरकारने पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले.

शिळ–डायघर सामूहिक अत्याचार प्रकरणाचा खटला उज्वल निकम लढणार

ठाणे: शिळ–डायघर पोलिस ठाण्याच्या हद्दीत शनिवार दि. ६ रोजी घोळ गणपती मंदिर परिसरात ३० वर्षीय विवाहितेवर तिघांनी सामूहिक अत्याचार करून निर्घृण खून केला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर मनसे नेते आ. राजू पाटील यांनी शिष्टमंडळासह वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची भेट घेतली. हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी त्यांनी केली. या मागणीची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेत जलदगती न्यायालयात खटला चालविण्यासह या खटल्यासाठी ज्येष्ठ विधीज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची सूचना गृहखात्याला दिल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांची नौटंकी !

नीती आयोगाच्या बैठकीवरून राजू शेट्टी यांचा शिंदेंना टोला

पुणे । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाची बैठक शनिवारी पार पडली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीला हजेरी लावत राज्यातील प्रमुख प्रश्न मांडले. तसेच प्रमुख मुद्दे मांडत ते सोडवण्यासाठी आयोगाने मदत करावी, अशी आग्रही मागणी पंतप्रधान मोदी यांच्याकडे केली. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी दूध, कापूस, सोयाबीन, कांदा शेतकऱ्यांचा मुद्दा उपस्थित केला. यावरून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी जोरदार टीका केली आहे. शेट्टी यांनी मुख्यमंत्री महोदय दुसऱ्यांना धोरण ठरविण्याचा सल्ला देण्याची नौटंकी कशासाठी करताय? असा खोचक सवाल शिंदे यांना केला आहे. शेट्टी यांनी ही टीका रविवारी (ता.२८) समाजमाध्यमावर एका पोस्टद्वारे केली आहे.

शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम...

निवडणुकीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारे निर्णय घेण्यात येत आहेत. हा आव आणू नका. निवडणुकीच्या तोंडावर नौटंकी करून कांदा व सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांची सुध्दा तीच अवस्था करणार आहात काय? असा सवाल देखील शेट्टी यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना केला आहे.

मुख्यमंत्री शिंदे यांनी नीति आयोगाच्या बैठकीत राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. तसेच नदीजोड प्रकल्पाला वेग देण्यासह दुध, कापूस, सोयाबीन, कांद्याच्या संदर्भात शेतकऱ्यांच्या मागण्या आणि प्रश्न बैठकीत ठेवले. तसेच शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न आणि त्यांच्या समस्या फक्त पंतप्रधान मोदी यांनाच समजू शकतात. त्या त्यांनी सोडवाव्यात ◀◀ पान २ वर

कोचिंग सेंटरमध्ये पाणी शिरून ३ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली: दिल्लीतील जुन्या राजेंद्रनगर येथील राव आयएएस कोचिंग सेंटरच्या तळघरात अचानक पाणी घुसल्याने ३ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. या प्रकरणाची दखल घेऊन कोचिंग सेंटरचा मालक आणि संयोजकाला अटक केल्याची माहिती दिल्ली पोलिसांनी दिली.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका विद्यार्थ्याने सांगितले की, लायब्ररी ७ वाजण्याच्या सुमारास बंद होते. यावेळी सुमारे ३० विद्यार्थी उपस्थित होते. आम्हाला बाहेर पडण्यास सांगण्यात आले. सर्व विद्यार्थी तळघरातून बाहेर पडत होते. मात्र पाणी इतके वेगाने आले की, काही विद्यार्थी अडकले आणि दोन ते तीन मिनिटांत संपूर्ण तळघर तुडुंब भरले. पावसाचे पाणी इतके घाण होते की, खाली काहीच दिसत नव्हते. शासनाने घालून दिलेल्या नियम आणि अटींनुसार कोणत्याही कोचिंग सेंटर आणि लायब्ररीच्या इमारतींचे बांधकाम झालेले नाही. अपघातस्थळी ◀◀ पान २ वर

विधानसभेआधीच मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावणार

तिढा सुटणार: शरद पवारांचे शिष्टमंडळाला मोठे आश्वासन

अहमदनगर । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सध्या राजकारण तापले आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मराठा समाजाच्या शिष्टमंडळाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची अहमदनगर येथे भेट घेतली. वीस मिनिटांच्या चर्चेअंती शरद पवार यांनी मराठा समाजाच्या शिष्टमंडळाला आरक्षणाबाबत सकारात्मक संकेत दिले आहेत. त्यामुळे गेल्या १० महिन्यापासून राज्यात आरक्षणाचा तिढा अखेर सुटणार असल्याचे दिसते.

गेल्या १० ते ११ महिन्यापासून राज्यात सामाजिक अस्तिरता असून मराठा आणि ओबीसी समाजात तिढा निर्माण झालेला आहे. यावरुन हाणामाऱ्या, गुन्हा दाखल होणे, वादग्रस्त पोस्ट असे प्रकार घडले आहेत. महाराष्ट्र त्यामुळे एकप्रकारे अशांत आहे. सत्ताधाऱ्यांना हा तिढा सोडवण्यात अपयश आल्याने अखेर काही दिवसापुर्वी शरद पवार यांची छगन भुजबळ यांनी भेट घेऊन आपण यात लक्ष घालून पुढाकार घेण्याची विनंती केली होती. त्यास होकार दिल्यावर पवार यांनी काही नेत्यांच्या भेटी सुध्दा घेतल्या आहेत. त्यातच अहमदनगर येथील मराठा समाजाचे शिष्टमंडळ पवारांच्या भेटीला गेले. पवार यांच्याशी झालेल्या चर्चेबाबत या शिष्टमंडळातील मराठा कार्यकर्ते गजेंद्र दांगट म्हणाले की, आज सकल मराठा समाजाने शरद पवार साहेबांची भेट घेतली. त्यात पवार साहेबांनी आम्हाला सकारात्मक प्रतिसाद दिला. जर एकनाथ शिंदे मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्यायला तयार असतील तर राष्ट्रवादी पक्ष आणि शरद पवार यात कुठलेही राजकारण न करता मराठा आरक्षणासाठी एकनाथ शिंदेंना समर्थन देईल. आरक्षणाची लढाई आता शेवटच्या ◀◀ पान २ वर

मी आज पर्दाफाश करणार–दरेकर

मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यातील राजकीय वातावरण तापताना दिसत आहे. आरक्षणाच्या प्रश्नावरुन विरोधकांकडून सरकारवर निशाणा साधला आहे. यावर आता भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी मोठा इशारा दिला आहे. राजकीय बोलण्यापेक्षा मूळ प्रश्नांना बगल देण्यास सुरुवात केली आहे. फेक नरेटीव्ह कसा सेट केला जातो, त्याचा पर्दाफाश मी सोमवारी करणार आहे, असा इशारा प्रवीण दरेकर यांनी केला आहे. त्यामुळे दरेकर आता नेमका काय पर्दाफाश करतात? ते पाहणे महत्त्वाचे असणार आहे. दरेकर पुढे म्हणाले, सरकार आंदोलकांच्या भूमिकेशी सहमत आहे. पण ओबीसी कोट्यामधून आरक्षण द्या, या मागणीसोबत कुणीही राजकीय पक्ष सहमत नाही. माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावे का? याबाबत भूमिका स्पष्ट करावी. काँग्रेस, उद्धव ठाकरे किंवा मविआने भूमिका स्पष्ट करण्याची मागणी मराठा नेते मनोज जरांगे यांनी करावी असे आवाहन प्रवीण दरेकर यांनी केले आहे.

शरद पवारांनी मराठा समाजाची मातीच केली–सदाभाऊ खोत

मराठा समाजाला न्याय देण्याचे काम उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच केले आहे. महाराष्ट्रात मराठा समाजाचे अनेक मुख्यमंत्री झाले पण त्यांनी मराठा समाजाला न्याय दिला नसल्याचे रयत क्रांती संघटनेचे प्रमुख आमदार सदाभाऊ खोत म्हणाले. शरद पवार हे चार वेळा मुख्यमंत्री झाले. मराठ्यांचे नेते म्हणून मिरवले. पण मराठा समाजाची त्यांनी मातीच केल्याचे सदाभाऊ खोत म्हणाले. दोनदा मराठा समाजाला आरक्षण देण्याचे काम एकदा देवेंद्र फडणवीस यांनी केले. दुसऱ्यांदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्याचे सदाभाऊ खोत म्हणाले.

बैठकीत सकारात्मक चर्चा

यावेळी मराठा कार्यकर्ते मदन आढाव म्हणाले की, आम्ही सगळे पवार साहेबांना भेटायला आलो होतो. आम्ही त्यांना सांगितले की, आम्हाला ओबीसीतून आरक्षण पाहिजे. पवार साहेबांनी आम्हाला सांगितले की, जो निर्णय मुख्यमंत्री घेतील मी त्याच्यासोबत राहील. मात्र, आम्ही त्यांना स्पष्ट सांगितले की, इतक्या दिवस मराठा समाज तुमच्यासोबत राहिलेला आहे. आता तुम्हाला द्यायची वेळ आली आहे तर ते तुम्ही दिले पाहिजे. बैठकीत सकारात्मक चर्चा झाली आहे. येत्या दोन–तीन दिवसात मुख्यमंत्र्यांना बोलावून मी माझे म्हणणे स्पष्ट करेल, असे पवार साहेबांनी म्हटल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

बीडच्या पाणीपुरवठा प्रश्नी आज मंत्रालयात बैठक

आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम यांच्या याचिकेवर न्यायालयाचे आदेश

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अनियमित पाणी पुरवठ्यासारख्या मुलभूत प्रश्नी सत्ताधाऱ्यांकडून चालढकल करण्यात येत असल्याने आ.संदीप क्षीरसागर आणि माजी आ.सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सदरील याचिकेवरील औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार आज (दि.२९) रोजी दुपारी १२:३० वा. मंत्रालयात बीडच्या पाणीप्रश्नावर बैठक होणार आहे.

बीड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत चाललेली आहे. सद्यस्थितीला शहराची लोकसंख्या जवळपास ३ लाख एवढी आहे. आणि ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बीड शहराला सध्या कार्यरत असलेल्या पाणीपुरवठा योजनेतून माजलगाव धरणाच्या बॅकवॉटर मधून २४ एमएलटी पाणीपुरवठा होतो. परंतु ही योजना ज्यावेळी आली होती त्यावेळी बीड शहराची लोकसंख्या एक ते दीड लाख होती. परंतु आता शहराची लोकसंख्या दुप्पट झाली आहे त्यामुळे सध्या कार्यरत असलेली ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२७ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : २.५० क्विंटल			
	२,९०१	२,९०१	२,९०१
ज्वारी/हायब्रिड :५७.५० क्विंटल			
	२,२४१	२,७४१	२,४८३
मूग :१४.५० क्विंटल			
	१,९५०	३,०४१	२,४५५
तूर : १४.५० क्विंटल			
	१०,२००	१०,३७२	१०,२८६
उडीद : ०.५० क्विंटल			
	४,००१	४,००१	४,००१
बाजरी: ७.५० क्विंटल			
	२,६२२	३,३५५	२,९०३
चिंच/लोकल: २०.०० क्विंटल			
	१,१००	३,५५०	२,३२५
सोयाबीन: १०५.०० क्विंटल			
	४,४००	४,४२०	४,४१०
हरभरा: २.०० क्विंटल			
	५,३००	६,५५१	५,९२५

महाराष्ट्राच्या राज्यपालपदी सी.पी.राधाकृष्णन

राष्ट्रपतींकडून ६ राज्यांमध्ये नवीन राज्यपालांच्या नियुक्त्या, हरिभाऊ बागडे राजस्थानचे राज्यपाल

नवी दिल्ली । वृतसंस्था

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांनी सहा राज्यांमध्ये नवीन राज्यपालांची नियुक्ती आणि तीन राज्यपालांच्या बदलीची घोषणा केली. यानुसार महाराष्ट्राच्या राज्यपालपदी सी.पी. राधाकृष्णन यांची बदली करण्यात आली आहे. अगोदर ते झारखंडचे राज्यपाल होते. महाराष्ट्र विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली.

राष्ट्रपतींनी नियुक्त केलेल्या नवीन राज्यपालांमध्ये महाराष्ट्रात भाजपचे प्रभारी पद सांभाळलेले ओम माथूर यांची सिक्कीमचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली. जिष्णु देव वर्मा यांची तेलंगणाचे राज्यपाल, संतोष कुमार गंगवार यांची झारखंडचे राज्यपाल, रामेन डेका यांची छत्तीसगडचे राज्यपाल आणि सी. एच. विजयशंकर यांची मेघालयचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रपतींनी बदली केलेल्या राज्यपालांमध्ये सी.पी. राधाकृष्णन तेलंगणाचा अतिरिक्त कार्यभार असलेले झारखंडचे राज्यपाल यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली. ◀◀ पान २ वर

पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, भावना गवळी यांच्यासह विधानपरिषदेच्या ११ आमदारांनी घेतली शपथ

मुंबई । प्रतिनिधी

विधानपरिषद निवडणुकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचित सर्व ११ आमदारांचा शपथविधी सोहळा रविवारी संपन्न झाला. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या नवनिर्वाचित ◀◀ पान २ वर

शपथ घेणाऱ्या आमदारांची नावे

पंकजा मुंडे – भाजप, योगेश टिळेकर – भाजप, अमित गोरखे – भाजप, परिणय फुके – भाजप, सदाभाऊ खोत – भाजप, भावना गवळी – शिंदे शिवसेना, कृपाल तुमाने – शिंदे शिवसेना, शिवाजी गर्जे – राष्ट्रवादी, राजेश विटेकर – राष्ट्रवादी काँग्रेस, प्रज्ञा सातव – काँग्रेस, मिलिंद नार्वेकर – उद्धव ठाकरे पक्ष.

जामीन याचिकांना विलंब, कॉमन सेन्सचा वापर करा!

सरन्यायाधीश चंद्रचूड यांचा न्यायाधिशांना सल्ला, कनिष्ठ न्यायालयांच्या कार्यप्रणालीबद्दल नाराजी

नवी दिल्ली । वृतसंस्था

भारताचे सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांनी कनिष्ठ न्यायालयांच्या कार्यप्रणालीबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी जामीन याचिकांच्या प्रक्रियेमध्ये होणाऱ्या विलंबावर चिंता व्यक्त केली आहे. सरन्यायाधीशांनी कनिष्ठ न्यायालयांना सद्विविवेक बुद्धीचा वापर करण्याचे निर्देश दिले आहेत.

तुलनात्मक समानता आणि भेदभाव विरोधी बर्कले सेंटरच्या ११ व्या वार्षिक परिषदेत ते बोलत होते. भाषणानंतर त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले, त्यापैकी एक

प्रश्न मनमानी अटकेचा होता. डी वाय चंद्रचूड म्हणाले की, उच्च न्यायालयांमध्ये ज्या लोकांना जामीन मिळायला हवा, त्यांना तो मिळत नाही. यामुळे त्यांना सुप्रीम कोर्टाचे दरवाजे ठोठावे लागतात. या विलंबामुळे मनमाने पद्धतीने अटक केलेल्यांची समस्या आणखी गंभीर होते. सर्वोच्च न्यायालय वारंवार हे सांगण्याचा प्रयत्न करत आहे की, देशातील संस्थांमध्ये असलेल्या अविश्वासामुळे ही समस्या निर्माण होते आहे. जामीन याचिकांच्या बाबतीत अनेकदा न्यायालयीन प्रक्रिया खूपच वेळखाऊ ठरते. यामुळे आरोपींना अनावश्यकपणे तुरुंगात राहावे लागते. सरन्यायाधीशांनी याचिकांच्या जलद निपटाऱ्यासाठी न्यायालयांना अधिक सतर्क आणि तर्कशुद्ध पद्धतीने काम करण्याचे आवाहन केले आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी न्यायालयीन कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्याची गरज व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले आहे की न्यायाधीशांनी न्यायदान करताना तर्कशुद्ध विचारांचा वापर करायला हवा. यामुळे आरोपींना त्वरित न्याय मिळेल आणि न्यायव्यवस्थेवरचा ताण कमी होईल.

सर्व बाबींचा विचार करायला हवा...

सरन्यायाधीशांनी न्यायाधीशांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. त्यांनी स्पष्ट केले की न्यायाधीशांनी जामीन याचिकांच्या बाबतीत विचार करताना सर्व पक्षांचा विचार करायला हवा आणि न्यायालयीन प्रक्रिया जलद आणि प्रभावी करायला हवी. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या या वक्तव्यामुळे कनिष्ठ न्यायालयांच्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा होण्याची आशा आहे. जामीन याचिकांच्या प्रक्रियेमध्ये होणाऱ्या विलंबामुळे आरोपींना होणारा त्रास कमी होईल आणि न्यायव्यवस्था अधिक प्रभावी बनेल.

cmyk

अग्रलेख

हा आर्थिक दहशतवाद?

सध्या उत्तर प्रदेशमधील प्रसिद्ध कावड यात्रा विशेष चर्चेत आहे. या यात्रा मार्गावरील दुकानदारांनी आपली ओळख दुकानाच्या पाटीवर दर्शवावी असा आदेश उत्तर प्रदेश सरकारने काढला आणि वादाला सुरुवात झाली. प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या निर्णयाला सुरुवातीला स्थगिती दिली. परंतु उत्तर प्रदेश सरकारने पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले. त्यावर झालेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारचा युक्तिवाद फेटाळून लावत अशा प्रकारे कुणावर त्यांची नावे जाहीर करण्याची जबरदस्ती करता येणार नाही, असे स्पष्ट शब्दांत बजावले.

उत्तर प्रदेशात कावड यात्रेला खूप महत्त्व आहे. यायात्रेच्या निमित्ताने लाखो भाविक श्रावण महिन्यात गंगाजलाने भगवान शंकराला जलाभिषेक करतात. हरिद्वार, गोमुख, उत्तराखंडमधील गंगोत्री आदी ठिकाणांहून गंगाजल घेतले जाते. तेथून ते काशी विश्वनाथ, पुरा महादेव, मेरठ आदी ठिकाणच्या प्रसिद्ध शिवमंदिरांमध्ये जलाभिषेकासाठी कावडीतून आणले जाते. या यात्रा

मार्गाच्या दोन्ही बाजूला दुकाने, उपहारगृह असतात. यात्रेकरूंना याठिकाणी जेवणही दिले जाते. याच दुकानांवर त्यांच्या मालकाचे व कर्मचाऱ्यांचे नाव असणाऱ्या पाट्या असाव्यात, असा आदेश उत्तर प्रदेश सरकारने काढला होता. त्यापाठोपाठ मध्य प्रदेश व उत्तराखंड सरकारनेही असाच आदेश जारी केला. नाव जाहीर केल्यामुळ दुकानदार वा कर्मचारी कोणत्या जाती-धर्माचे आहेत हेही पर्यायाने जाहीर होत असून हा निर्णय समाजामध्ये तेढ निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरू शकतो, अशी भूमिका दुकानमालक आणि त्यांना समर्थन करणाऱ्या याचिकाकर्त्यांची होती. उत्तर प्रदेश सरकारने, यात्रेदरम्यान आपण कोणत्या प्रकारचे जेवण खातोय, यासंदर्भात कावड यात्रेकरूंना माहिती असावी आणि त्यात पारदर्शकता यावी म्हणून हा आदेश जारी केला. त्यांच्या धार्मिक श्रद्धा लक्षात घेता त्यात चुकूनही काही अडचण येऊ नये, यासाठी हे केले, असा युक्तिवाद केला होता. उत्तर प्रदेश सरकारच्या अन्न सुरक्षा कायद्यानुसार अशा प्रकारच्या स्टॉलधारकांनी त्यांची माहिती जाहीर करणे क्रमप्राप्त आहे, असाही दावा उत्तर प्रदेश सरकारने केला होता.

सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारचे हे सगळे तर्क फेटाळून लावले. उत्तर प्रदेश सरकारची ही भूमिका कट्टरतावादाला खतपाणी घालणारी आहे, यात शंका नाही. भाजपचे राजकारण ध्रुवीकरणाच्या पायावरच उभे आहे. त्यात योगी सरकार सत्तेवर आल्यापासून उत्तर प्रदेश या ध्रुवीकरणाच्या राजकारणाची कर्मभूमी ठरला आहे. मागच्या दोन लोकसभा निवडणुकीत हे ध्रुवीकरणाचे राजकारण चांगलेच यशस्वी ठरले. परंतु यावेळच्या लोकसभा

निवडणुकीत मतदारांनी धार्मिक अस्मिता पोटाच्या भूकेपेक्षा मोठी नसते, हाच संदेश मतपेटीच्या माध्यमातून भाजपला दिला. योगी आदित्यनाथ यांच्या कारकिर्दीत उत्तर प्रदेशात हिंदुत्वाचा प्रभाव वाढविण्याचे पुरेपूर प्रयत्न होत आहेत. योगी सरकारच्या अनेक कारवाया स्थानिक अल्पसंख्याकांच्या मनात दहशत निर्माण करणाऱ्या ठरल्या. त्याच मालिकेत या निर्णयाकडे पाहावे लागेल. वास्तविक याच उत्तर प्रदेशमध्ये यावेळी भाजपला लोकसभा निवडणुकीत सगळ्यात मोठा झटका बसला. संपूर्ण ८० जागा जिंकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपला उत्तर प्रदेशातील मतदारांनी थेट ३३ वर नेऊन ठेवले. भाजपपेक्षा समाजवादी पक्षाच्या अधिक जागा आल्या. या दणक्यानंतर तरी धार्मिक तेढ निर्माण करून आपले राजकारण साधण्याच्या भाजपच्या नीतीला खिळ बसेल असे वाटत होते, परंतु तसे झाल्याचे दिसत नाही. या आधी मुस्लिमांना थेट लक्ष्य केले जात होते, यावेळी रणनीती थोडी बदलल्याची दिसते. मुस्लिमांवर आर्थिक बहिष्कार टाकण्याचे डावपेच कितपत यशस्वी ठरू शकतील याची चाचपणी योगी सरकारच्या या निर्णयातून होत असल्याचे दिसते.

वास्तविक ही यात्रा गेल्या अनेक वर्षांपासून नियमितपणे केली जात आहे. आजवर यात्रेदरम्यान कुठेही चुकीचे अन्न आणि तेही जाणीवपूर्वक कावडियांना दिल्या गेल्याचे एकही उदाहरण समोर आले नाही. यात्रेचा मार्ग मुस्लिमांची दाट वस्ती असलेल्या भागांतून जातो. कावडियांची संख्या लाखोच्या घरात पोहोचली आहे. परंतु आजपर्यंत कोणत्याही प्रकारची तक्रार आली नव्हती. उलट या भागांतील मुस्लीम रहिवासी नेहमीच कावडियांच्या गरजा भागवताना दिसतात. मग, अचानक असे काय घडले की ज्यामुळे योगी सरकारने मुझफ्फरनगरमधील पोलिसांनी दिलेल्या आदेशाला मान्यता दिली आणि दुसऱ्याच दिवशी ते आदेश उत्तर प्रदेशातून जाणाऱ्या यात्रा मार्गावरील सर्व पोलीस ठाण्यांत लागू करण्यात आले. हा नवा सामाजिक, आर्थिक दहशतवादाचा तर प्रकार नाही. तसे असेल तर कट्टरतावाद आता वेगळ्या आणि अधिक घातक दिशेने पुढे जाऊ पाहत आहे, असेच म्हणावे लागेल.

मताचे गठ्ठे पाहूनच न्याय मिळत असेल तर प्रत्येक पत्रकार एक गठ्ठा आहे- वसंत मुंडे

दीक्षाभूमी येथून उत्स्फुर्त प्रतिसादात पत्रकार संवाद यात्रेला सुरुवात

नागपूर। प्रतिनिधी

दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेला रविवारी (दि. २८) दीक्षाभूमी येथून राज्यभरातील पत्रकारांच्या प्रचंड प्रतिसादात सुरुवात झाली. यावेळी उपस्थित शेकडो पत्रकारांना मार्गदर्शन करताना, वसंत मुंडे म्हणाले, राज्यकर्ते मताचे गठ्ठे पाहूनच समाजातील विविध घटकांसाठी योजना जाहीर करत असतील तर या राज्यातला प्रत्येक पत्रकार मताचा गठ्ठा आहे. याचा विचार करून राज्यकर्त्यांनी पत्रकारांचे प्रश्न सोडवावेत असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, मंत्रालय विधिमंडळ वार्ताहार संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी हिरवा झेंडा दाखवल्यानंतर संवाद यात्रेला सुरुवात झाली.

नागपूर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखालील बहुचर्चित राज्यव्यापी पत्रकार संवाद यात्रेला रविवारी (दि.२८ जुलै २०२४) सुरूवात झाली. लोकशाहीच्या बळकटीसाठी, पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी, हा संकल्प घेवून दीक्षाभूमी ते मंत्रालय या पत्रकार संवाद यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वासराव आरोटे, मंत्रालय विधिमंडळ वार्ताहार संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, माजी अध्यक्ष चंदन शिरवाळे,कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, , राज्य समन्वयक संतोष मानुरकर, निलेश सोमाणी, महेश पाणसे, नितीन शिंदे,नयन मोढें, वैभव स्वामी यांच्यासह राज्यभरातील पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते. यावेळी पुढे बोलताना वसंत मुंडे म्हणाले, घटना लिहिण्यापूर्वी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे पत्रकार होते. बहिष्कृत भारत हे वर्तमानपत्र त्यांनी काढले. यामुळे महामानव बाबासाहेबांनी जिथे दीक्षा घेतली, त्या दीक्षा भूमीतूनच पत्रकार संवाद यात्रा काढायची असे ठरवले होते. महामानव बाबासाहेबांच्या पावन अशा दीक्षाभूमीला वंदन करून पत्रकार संवाद यात्रा पुढे जाणार आहे. आजपर्यंत पत्रकार सर्वसामान्य माणसाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, प्रशासकीय, राजकीय प्रश्न शासन आणि प्रशासनाच्या दरबारात मांडत आले आहेत. सर्वसामान्य माणसाचा आवाज बनत आले आहेत. कायम लोकांचा आवाज बनत आलेल्या पत्रकारांवर आज स्वतःसाठी आवाज उठवण्याची वेळ आली आहे. कारण कोरोना महामारीनंतर पत्रकार ज्या आवस्थेतून जात आहेत. जे प्रश्न आणि संकटांचा सामना करत आहेत, त्याकडे कोणाचेच लक्ष नाही. पत्रकार हा समाजाचा एक घटक आहे, हे मानायला देखील राज्यकर्ते आणि प्रशासन तयार नाही. समाजातल्या प्रत्येक घटकासाठी शासनाच्या काही ना काही योजना आहेत. परंतु पत्रकारांसाठी कोणत्याच योजना नाहीत. पत्रकार समाजातला एक घटक असेल तर त्याच्यासाठी शासनाच्या योजना का नाहीत? हे विचारण्यासाठी ही पत्रकार संवाद रॅली आहे. सरकार विविध घटकांचे मतांचे गठ्ठे पाहून त्यांच्यासाठी विविध योजना जाहीर करत असेल तर सरकारने पत्रकारांचा मतांचा गठ्ठा किती मोठा आहे, हे देखील लक्षात घ्यावे, असे सांगत संवाद यात्रा जसजशी पुढे जाईल तसे लोकांचे मोठ्या प्रमाणात समर्थ मिळेल आणि राज्य सरकार पत्रकारांच्या प्रश्नाबाबत गंभीर बनेल, असा विश्वास वसंत मुंडे यांनी व्यक्त केला. पुढे बोलताना त्यांनी ही संवाद यात्रा पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते, मालक, वर्तमान पत्रातील इतर कामगार यांना न्याय मिळवून देण्यासाठी असल्याचे शेवटी वसंत मुंडे म्हणाले. संवाद यात्रेत सर्व स्तरातील पत्रकारांनी सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी केले. दरम्यान, विश्वासराव आरोटे म्हणाले, पत्रकार संवाद यात्रेची संकल्पना प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांची होतीच, परंतु त्यांच्यात नेतृत्व आणि दातृत्व देखील आहे. संवाद यात्रा काढताना संघटनेच्या प्रत्येक पदाधिकाऱ्यांला वसंतराव यांनी विश्वासात घेतले. यामुळेच आज संवाद यात्रेच्या शुभारंभाला राज्यभरातील सर्व स्तरातील पत्रकारांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याचे विश्वासराव आरोटे म्हणाले. तर संपादक संतोष मानुरकर म्हणाले, आजचा पत्रकार संवाद यात्रेचा शुभारंभ झालेला २८ जूलै हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवला जाणार आहे. ही यात्रा जेंव्हा मुंबई आणि मंत्रालयात जाईल तेंव्हा वसंतराव मुंडे हे राज्यभरातील पत्रकारांसाठी गोड बातमी देतील, असे मानुरकर म्हणाले. प्रास्ताविकात विभागीय अध्यक्ष प्रमोद शेंडे यांनी संवाद यात्रा मंत्रालयावर धडकल्यानंतर आपले प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे हे नक्कीच पत्रकारांसाठी काही ना काही घेवून येतील असा विश्वास व्यक्त केला. दीक्षाभूमी येथील पत्रकार संवाद यात्रेच्या शुभारंभ प्रसंगी राज्यभरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

५० संघटनांचा पाठिंबा

दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेच्या शुभारंभ प्रसंगीच राज्यभरातील वेगवेगळ्या सामाजिक आणि विचाराच्या संघटनांनी पत्रकार संवाद यात्रेला पाठिंबा दिला. विशेष म्हणजे राज्यातील अनेक आजी माझी लोकप्रतिनिधींनी पत्रकारांच्या प्रश्नाबाबत संवेदना दाखवत पत्रकारांच्या सोबत असल्याचे सांगितले.

संवाद यात्रेत राज्यभरातील पत्रकारांच्या गाड्यांचा ताफा

पत्रकार आणि सर्व स्तरातील माध्यम कर्मी यांचे प्रश्न घेऊन दीक्षाभूमी येथून मुंबईच्या दिशेने निघालेल्या संवाद रॅलीचा मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे चंदन शिरवाडे यांनी हिरवा झेंडा दाखवल्यानंतर रॅलीला सुरुवात झाली. संवाद यात्रेचा पहिला मुक्काम महात्मा गांधींची पावन भूमी वर्धा येथे आहे. सेवाग्रामकडे पत्रकार संवाद रॅली जात असताना राज्यभरातील शेकडो पत्रकार आपल्या वाहनांसह रॅलीत सहभागी झाल्याने रॅलीतील वाहनांची रांग अर्धा ते एक किलोमीटर एवढी झाली होती. पत्रकार रॅलीचा हा ताफा आणि त्यांची एकजूट राज्यकर्त्यांना नक्कीच विचार करायला भाग पाडणार पाडणार असल्याचा विश्वास यावेळी पत्रकार बांधव व्यक्त करत होते.

साडेसात लाख रुपये किंमतीच्या तेरा मोटारसायकल जप्त,आरोपी अटक

अंबड । प्रतिनिधी

अंबड शहरात चोरलेली मोटार सायकल विक्री करण्याच्या उददेशाने शहरातील मत्स्योदरी मंदीर परीसरात मिळुन आल्याने त्यास विश्वासात घेवुन विचारपुस केली. तेव्हा या आरोपीने त्याने अंबड, पाचोड, छत्रपती संभाजीनगर, पैठण, सातारा, मुकुंदवाडी, पुंडलिकनगर, कळंब जि. धाराशिव ताडकळस जिल्हा परभणी याठिकाणावरुन त्याचे एका साथीदारासह मोटार सायकली चोरुन आणल्याची कबुली दिल्याने त्यास अंबड पोलिसांनी अटक करुन त्यांचेकडुन १३ मोटार सायकली जप्त करण्यात आल्या असल्याची माहिती अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री आर. के. नाचन यांनी दिली आहे.

गेल्या काही दिवसापासुन पोलीस ठाणे अंबड हददीतुन मोटार सायकल चोरी जाण्याच्या घटना घडल्याने पोलीस निरीक्षक आर. के. नाचण यांनी पोलीस ठाणेच्या डी. बी. पथकाला मार्गदर्शन करुन चोराचा शोध घेवुन मोटार सायकल हस्तगत करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यावरुन दिनांक २७ रोजी पोलीस निरीक्षक आर. के. नाचण यांना गुप्त माहीती मिळाली की, इसम नामे संभाजी नाना ननवरे रा. रुई हा अंबड शहरात मोटार सायकल चोरीचे उददेशाने येत आहे. त्यावरुन त्यांनी पोस्टेच्या डि बी. पथकाला सदर इसमास ताब्यात घेण्याबाबत सुचना देवुन रवाना केले होते.त्यानुसार पोलीस ठाणे अंबडचे डि बी. पथक हे त्याचा शोध घेत असतांना इसम नामे संभाजी नाना ननवरे रा. रुई ता. अंबड जि.जालना या आरोपीला ताब्यात घेतले आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपानी, उपविपो अंबड विशाल खांबे यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक आर. के. नाचण, सपोनि अमोल गुरले, पोउपनि स्कॉट, पोहेकॉ/१११८ विष्णु चव्हाण, पोहेकॉ/१२७२ दिपक पाटील, पोहेकॉ/९२७ आविनाश नरवडे, पोकॉ/४७ स्वप्निल भिसे, पोकॉ/४२९ विठठल वैराळ, पोकॉ/५०८ वंदन पवार, यांचेसह स्थागुशाचे पोहेकॉ/९४९ सागर बावीस्कर यांनी केली आहे.

विकासाच्या नावाखाली दिशाभूल करणाऱ्यांना जनताच धडा शिकवणार-आ.कैलास गोरंट्याल

जालना । प्रतिनिधी

सत्तेत असतांना ज्यांना मतदार संघात विकास साधता आला नाही असे काही तथाकथित नेते निवडणुका जवळ आल्याने विकास कामांचे उद्घाटन करतांना दिसून येत आहे. मात्र, अशा नेत्यांना आता जनतेने चांगले ओळखले असून येत्या निवडणुकीत त्यांची जागा मतदार निश्चितपणे दाखवून देतील असा विश्वास आ. कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला आहे.

जालना विधानसभा मतदार संघातील रामनगर येथे काल शनिवारी ५ कोटी ५ लक्ष रुपये खर्चून रामनगर ते मानेगाव, तलाठी सज्जा कार्यालय, रस्ता व पेव्हर ब्लॉक, भूमिगत गटार योजना, रामनगर अंतर्गत सिमेंट रस्ता, श्रीक्षेत्र खंडोबा माळ मंदिर सभामंडप आणि दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत भूमिगत गटार योजनेच्या कामांचे उद्घाटन व लोकार्पण आ. कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुढे बोलतांना आ. कैलास गोरंटयाल म्हणाले की, आपण आपल्या आमदारकीच्या कार्यकाळात केवळ विकासाला प्राधान्य दिले आहे. मतदार संघातील प्रत्येक गावात विकासाची कामे मार्गी लावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. मात्र, या मतदार संघातील जनतेमुळे ज्यांना दहा वर्ष आमदारकी आणि दोन वेळा राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली त्या काळात त्यांनी मतदार संघाच्या विकासा ऐवजी स्वतःचा आणि कुटुंबाचा विकास साधण्यात धन्यता मानली. कुंभकर्ण ज्या पद्धतीने वर्षातील सहा महिने झोप घेत होता आणि सहा महिने जागत होता. तशीच काहीशी परिस्थिती या नेत्याची झाल्याचे दिसून येत आहे. निवडणुका जवळ आल्याने काही तथाकथित नेते विकास कामांचे नारळ फोडतांना दिसत असले तरी त्यांचा हा बनवाबनवीचा खेळ आता जनतेच्या लक्षात आल्याने येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जागृत असलेला मतदार त्यांना त्यांची जागा दाखवुन देतील असा विश्वास आ. कैलास गोरंटयाल यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद सदस्य मुरलीधर शेजुळ, सरपंच गोपाल मोरे, जालना तालुका काँग्रेसचे अध्यक्ष वसंत जाधव, जिल्हा उपाध्यक्ष राम सावंत, उपसरपंच वसंत सोनवणे, दत्ता पाटील घुले, सोपान तिरुखे, राजू पाटील शिंदे, राम शेजुळ, लाला पा. लकडे, मनोज गुळमकर, माऊली कल्हारे, अंकुश कल्हारे, विष्णू शेजुळ, इंदुबाई मैंद, नायब तहसीलदार सोनवणे, तलाठी अंबडकर यांच्यासह रामनगरसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १वरून...

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर

अशी आग्रही मागणी केली. या बैठकीला विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल यांच्यासह नीती आयोगाचे उपाध्यक्ष, आयोगाचे पदसिद्ध सदस्य आणि केंद्रीय मंत्री उपस्थित होते. यावरून शेट्टी यांनी शिंदे यांच्यावर जोरदार टीकेची झोड उठविली आहे. शेट्टी यांनी, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी १०० रूपये व ५० रूपये दुसरा हप्ता देण्याचे मान्य केले होते. तसा प्रस्ताव देखील कारखान्यांनी मंजूरीसाठी शासनाकडे सादर केला होता. मात्र गेली आठ महिने तो धूळ खात पडला आहे. त्यावर निर्णय घेण्यास सरकारला आणि विशेषत: तुम्हाला वेळ नाही असा आरोप शेट्टी यांनी केला आहे. तर ज्या धोरणात सरकारला १ रूपयाही देणे लागत नाही. तेथे शेतकऱ्यांचे हक्काचे, घामाचे पैसे कारखान्यांकडे अडकले आहेत. कारखाने शेतकऱ्यांचे पैसे देण्यास तयार असून फक्त एका बैठकीमुळे निर्णय झालेला नाही. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील ऊस दर नियंत्रण समितीची बैठकच गेल्या आठ महिन्यापासून बोलवलेली नाही. याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांची ४ वेळा, मुख्य सचिव यांची ८ वेळा स्वत: भेट घेतल्याचे शेट्टी यांनी म्हटले आहे.

विधानसभेआधीच मराठा

टप्प्यात आली आहे. आम्ही सर्व राजकीय नेते एकत्र येऊन विधानसभेच्या आधी हा विषय मार्गी लावू, असे आश्वासन शरद पवारांनी दिले. मराठा समाजाने शरद पवारांना सूचित केले की, इतके दिवस मराठा समाजाने तुमच्यासाठी केले. मात्र, आता तुम्ही सर्व नेत्यांनी एकत्र येऊन मराठा समाजासाठी करावे. त्यावर देखील शरद पवारांनी सकारात्मक उत्तर दिले. विधानसभा निवडणुकीआधी तुम्ही गुलाल उडवाल, असा आम्हाला शब्द देण्यात आलेला आहे. मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण मिळेल, असे संकेत शरद पवार साहेबांनी दिल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली आहे.

पुराचे पाणी कोचिंग सेंटरमध्ये

बचावकार्यासाठी कोणत्याही प्रकारची अतिरिक्त जागा नाही. याचबरोबर आपत्कालीन परिस्थितीमध्ये बाहेर जाण्याचा दुसरा कोणताही मार्ग नसल्यामुळे अशा घटना या भागात घडत आहेत. राव कोचिंग सेंटरच्या घटनेवर दिल्लीच्या शिक्षणमंत्री आतिशी म्हणाल्या की, अग्निशमन सेवा आणि एनडीआरएफ घटनास्थळी तैनात होते. दिल्लीचे महापौर आणि स्थानिक आमदारही घटनास्थळी हजर होते. या दुर्घटनेच्या न्यायालयीन चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. या दुर्घटनेला जो कोणी जबाबदार असेल त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत,भावना गवळी

सदस्यांना शपथ दिली. यावेळी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे देखील उपस्थित होते. विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. यामध्ये महायुतीचे ९ उमेदवार विजयी झाले. तर महाविकास आघाडीचे २ उमेदवार निवडणू आले होते. तर शेकपाचे जयंत पाटील यांचा पराभव झाला होता.

महाराष्ट्राच्या राज्यपालपदी

गुलाब चंद कटारिया आसामचे राज्यपाल होते त्यांची आता पंजाबचे राज्यपाल म्हणून नियुक्ती आणि चंदीगडच्या केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक म्हणूनही नियुक्ती करण्यात आली आहे. तर लक्ष्मण प्रसाद आचार्य सिक्कीमचे राज्यपाल होते, आता त्यांना आसामचे राज्यपाल म्हणून नियुक्त केले गेले आणि मणिपूरच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभारही देण्यात आला आहे.

बीडच्या पाणीपुरवठा

२४ एमएलटीची योजना अपूरी पडत आहे. परिणामी शहरात कुठे ८-१० दिवसाला तर कुठे चक्क १५-१५ दिवसांतून एकदा पाणी मिळत आहे. दरम्यान बीड शहराची पाण्याची गरज लक्षात घेता शासनाकडून २०१७ मध्ये शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी २५ एमएलटी क्षमता असलेली पाणीपुरवठा योजना मंजूर केली. या योजनेचे ९५% पेक्षा अधिक काम पूर्ण झाले आहे. फक्त या वीज जोडणी न झाल्यामुळे या योजनेला अडथळा आला आहे. यामध्ये अडचण अशी आहे की, बीड नगरपालिकेकडे महावितरण विभागाची ३६ कोटी रूपये इतकी वीजबिल थकबाकी आहे. त्यामुळे महावितरणकडून या योजनेसाठी अतिरीक्त कनेक्शन मिळत नाही. आणि म्हणून केवळ वीजेच्या अभावाने बीड शहर पाण्यासाठी त्रस्त आहे. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी वारंवार शासनाकडे पाठपुरावा केला. प्रत्येक अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला. जिल्हा नियोजन समितीकडे, नगरपालिकेची थकबाकी भरून मूलभूत असलेला पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला. अनेकवेळा प्रशासनाकडे पाठपुरावा केला. परंतु सत्ताधाऱ्यांकडून या महत्वाच्या विषयात चालढकल केली जात आहे. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर आणि याचिकाकर्ते माजी आ.सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली. याचिका क्रमांक २१/२०२४ वर न्यायालयाने, ११ जून २०२४ रोजी बीड नगरपालिकेकडील वीजबिल थकबाकीच्या विषयावर नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव यांना सर्व संबंधितांची बैठक घेण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार सोमवारी (दि.२९) रोजी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी उर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव, जलसंपदा विभागाचे सचिव, महावितरण विभागाचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव, संभाजी नगर विभागाचे विभागीय आयुक्त, नगरपरिषद संचालनालयाचे आयुक्त तथा संचालक, बीड जिल्हाधिकारी, बीड नगरपालिकेचे प्रशासक, बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे सर्व उपस्थित राहणार आहेत. ही बैठक म्हणजे बीड शहराच्या पाणीपुरवठा प्रश्नावरील आ.संदीप क्षीरसागर व माजी आ.सय्यद सलीम यांच्या प्रयत्नांची यशाकडील वाटचाल असणार आहे.

टी.सी.हरवला आहे

अंबड ते जालना प्रवासाच्या दरम्यान श्रद्धा प्रमोद किरडे शारदानगर अंबड या विद्यार्थिनीचा दहावी पासचा (२०२४) मत्स्योदरी विद्यालय अंबड जि.जालना येथील टीसी ची मूळ प्रत हरवली आहे तरी कोणाला प्राप्त झाल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधवा.

संपर्क:::-मो.९४०५५३१२८३

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. २९ जुलै २०२४

प्राथमिक शिक्षक बाबासाहेब इंगोले यांची लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून निवड

माजलगाव (प्रतिनिधी) तालुक्यातील शिक्षक बाबासाहेब चंद्रसेन इंगोले यांनी एमपीएससी तर्फे क्रीडा अधिकारी पदाची परीक्षा दिली होती या परीक्षेत घवघवीत यश मिळवून लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे क्रीडा अधिकारी म्हणून निवड झाली आहे.परिस्थिती अनुकुल असताना यशाची टप्पे गाठणे सोपे काम परंतु नेमकी त्याच्या उलट प्रतिकूल परिस्थितीतून एकदा टप्पा हा इतरांसाठी मार्गदर्शक आणि प्रेरक ठरू शकतो. टोकेवाडी तालुका वडवणी चे सुपुत्र श्री बाबासाहेब चंद्रसेन इंगोले यांनी जिल्हा क्रीडा कार्यालय लातूर येथे क्रीडा अधिकारी पदावर पदभार घेतल्याने त्यांच्या निवडीबद्दल जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे बाबासाहेब इंगोले यांच्याकडे अभ्यासू शिक्षक आदर्श शिक्षक म्हणून जिल्हा भरात पाहिले जाते अंगी जिद्द आणि चिकाटी होते त्यामुळे प्रत्येक ठिकाणी मेहनत करणे हा त्यांच्या जीवनाचा पाया राहिला आहे आज सुद्धा तेवढीच मेहनत करण्याची तयारी आहे हीच मेहनत आज यशाच्या शिखरावर लिहून ठेवली आहे माजलगाव तालुक्यातील शेलापुरी रेनापुरी वसाहत शाळेत तेरा वर्ष सेवा दिली तेथील विद्यार्थी नवोदय विद्यालय सैन्यामध्ये इंजीनियरिंग एमबीबीएस त्यांच्या मार्गदर्शनाला आणि प्रयत्नाने प्रवेशित झाली, मंगरूळ नंबर एक येथील लमाणतांडा शाळेतही गोरमाटी भाषा आत्मसात करून विद्यार्थ्यांना धडे दिले, विद्यार्थी घडवत असताना आहे स्वतःही घडले डीएड बीपीएड सेट नेट पदव्या घेऊन उच्चशिक्षीत झाले, असे विद्यार्थी प्रिय व समाज प्रिय शिक्षक क्रीडा अधिकारी झाल्याने क्रीडा क्षेत्राला नावलौकिक मिळवून देतील ,याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व शुभेच्छा होत आहे, या यशात आई-वडील पत्नी मुले भाऊ बहिणी आणि नातेवाईक यांची खंबीर साथ लाभली याबद्दल त्यांनी त्यांचे मनपूर्वक आभार व्यक्त केले.

दिव्यांगांना संधी दिली तर ते सक्षमपणे काम करतील -अमरसिंह पंडित

अजितदादांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित दिव्यांग शिबिराला गेवराईत मोठा प्रतिसाद

गेवराई । प्रतिनिधी

दिव्यांग बंधू भगिनींच्या बाबतीत नुसती सहानुभूती दाखवून उपयोग नाही तर त्यांच्या क्षमता ओळखून त्यांना संधी दिली तर ते सक्षमपणे काम करतील, त्यासाठीच शारदा प्रतिष्ठान आणि साधु वासवाणी मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन करून दिव्यांग बांधवांना संधी देण्याचे काम करत असल्याचे प्रतिपादन शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे उद्घाटन करताना ते बोलत होते.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शारदा प्रतिष्ठान, गेवराई आणि साधु वासवाणी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई शहरात मोफत कृत्रिम हात व पाय शिबीराचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित साधु वासवाणी मिशनचे प्रोजेक्ट हेड मिलींद जाधव, डॉ. सुशिल ढगे, डॉ. सलील जैन, प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर, सभापती मुजीब पठाण, माजी सभापती कुमारराव ढाकणे, जगन काळे, जगन्नाथ शिंदे, बाबुराव काकडे, रिपाईचे किशोर कांडेकर, सावता परिषदेचे दादासाहेब चौधरी, शामकाका येवले, रणवीर पंडित आदी मान्यवर उपस्थित होते.आपल्या

भाषणात बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, मागील दोन वर्षा पासून शारदा प्रतिष्ठान कडून हे शिबीर आयोजित करण्यात येत आहे. मागच्या शिबिरातून आपण २७६ दिव्यांगाना कृत्रिम हात व पाय वाटप केले. या शिबिरातून जास्तीत जास्त दिव्यांगांना आधार दिला जाईल. ग्रामीण भागातील वाचन संस्कृती जोपासण्यासाठी वाचनालय आणि मुलींच्या शिक्षणासाठी वसतिगृहाची निर्मिती करण्यासाठी साधु वासवानी मिशनने सहकार्य करण्याचे आवाहन करुन भविष्यात अशा शिबीरांचे नियमीत आयोजन करणार असल्याचे अमरसिंह पंडित यांनी त्यांच्या भाषणात सांगितले.यावेळी बोलताना साधु वासवाणी मिशनच्या वतीने डॉ. सुशिल ढगे यांनी शिबीराच्या आयोजना बाबत अमरसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले. शिबिरात ३५० पेक्षा जास्त पात्र दिव्यांगांच्या अवयवाचे मोजमाप घेण्यात आले. पुढील महिण्यात त्यांना कृत्रिम हात व पायाचे वाटप केले जाणार आहे. कार्यक्रमाचे सुत्र संचलन माधव चाटे यांनी केले तर आभार भाऊसाहेब नाटकर यांनी मानले. कार्यक्रमाला दिव्यांगांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिव्यांगाना आधार देण्याचे काम शिवछत्र परिवार करत आहे - सुषमा वाघ

दिव्यांगासाठी गेवराई सारख्या ग्रामीण भागात अमरसिंह पंडित यांनी शिबीर घेऊन मोठा आधार दिला आहे. दिव्यांग बांधवांबरोबरच शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक, वक्तृत्व, क्रीडा अशा विविध क्षेत्रात शिवछत्र परिवार करत आहे. सर्वांना सोबत घेऊन चालणा-या शिवछत्र परिवाराला आपण सहकार्य करण्याचे आवाहन दिव्यांग प्रतिनिधी सुषमा वाघ यांनी यावेळी केले.

जीवन जगत असताना चांगले कर्म केले तर जीवनाचा अस्त चांगला होतो - पूज्य भदंत धम्मशिल थेरो

माजलगाव । प्रतिनिधी

शहरा जवळ असलेल्या केसापुरी कॅम्प येथील श्रावस्ती बुद्ध विहार येथे दिनांक २८ जुलै रोजी १० वाजता साप्ताहिकं बुद्ध वंदना पूज्य भिख्खू धम्मशील थेरो यांच्या धम्मदेशनेने संपन्न झाली.

दर रविवारी श्रावस्ती बुद्ध विहार येथे सद्धम्म सेवा संघाच्या वतीने साप्ताहिक बुद्ध वंदनेचे आयोजन करण्यात येते. या साप्ताहिक वंदनेच्या वेळी शहरातील बौद्ध उपासिका उपासक यांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होते. भदंत धम्मशिल थेरो यांनी उपस्थित उपासकाना

धम्मदेशना दिली. यामध्ये त्यांनी सांगितले की, आज श्रावस्ती बुद्ध विहार येथे साप्ताहिक बुद्ध वंदना आणि १२ वा वर्षावास हे दोन्ही कार्यक्रम येथे सूरू आहेत. यातून धम्म प्रचाराचे काम मोठ्याप्रमाणावर होत आहे. तसेच धम्मशिल भंते यांनी पंचशील म्हणजे काय? हे पटवून दिले. तसेच जीवन जगत असताना व्यक्तीने चांगलें काम केले पाहिजे. भविष्यातील जीवनाचा अस्त चांगला होतो. चोरी करु नये, खोटे बोलू नये, व्यभीचार करु नये, हे सुंदर उदाहरण देऊन उपस्थित उपासक यांना पूज्य भिख्खू धम्मशिल थेरो यांनी पटवून दिले. यावेळी उपस्थित उपासक यांनी मन लाऊन धम्मदेशना ग्रहण केली. साप्ताहिक बुद्ध वंदना कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष आयु.भगवान सातपुते यांनी केले. तर सूत्रसंचालन गौतम घनघाव यांनी केले. तर,आभार आयु. पांडुरंग जाधव यांनी मानले. तसेच या वेळी सद् धम्म सेवा संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. शेवटी शरणत्य घेऊन साप्ताहिक बुद्ध वंदना संपन्न झाली.

शिक्षण सप्ताह अंतर्गत श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात 'दप्तराविना शाळा' उपक्रम उत्साहात

माजलगाव । प्रतिनिधी

शिक्षण सप्ताह अंतर्गत शनिवार रोजी ५ वी ते ७ व ८ वी ते १० वी या दोन्ही विभागात 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर व उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे सर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी माता सरस्वती व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नंतर गायन, वादन, नृत्य, चित्रकला अशा विविध प्रकारचे कलागुणांना

सांस्कृतिक कार्यक्रम व विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या विविध कला गुणांचे सादरीकरण केले

प्रोत्साहन मिळावे या हेतूने असंख्य विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला होता. यामध्ये भक्ती गीते, गौळणी, भारुडे, लोकगीते या गीत प्रकारावर वर्ग शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली नृत्य बसविण्यात आले होते त्या गीताचे सादरीकरण करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीमती अपर्णा मुळे, श्रीमती अंजली वाघमारे यांच्यासह सर्व वर्गशिक्षक, संगीत, कला, क्रिडा तसेच विस्तार कार्य विभाग प्रमुख विशाल ठोसर, सर्व विषय शिक्षक यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी आनंद घेतला.

शालेय समितीच्या अध्यक्षपदी संतोष जगताप

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पाटेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या या पालक सभेच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे मावळते अध्यक्ष गणेश वाघ हे होते. पालक सभेचे प्रस्ताविक मुंडे सर यांनी केले या पालक सभेमध्ये शालेय उपक्रमाचे आयोजन आदी विषयावर चर्चा करण्यात आली व शालेय व्यवस्थापन समितीचे नव्याने निवड करण्यात आली सर्व पालकांच्या सर्वानुमते संतोष जगताप यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष पदी रवींद्र वाघ यांची निवड करण्यात आली. बीड

तालुक्यातील पाटेगाव नावाजलेली आहे शालेय व्यवस्थापन समितीची निवडणूक अध्यक्ष संतोष जगताप यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शालेय समितीचे पालक सभेस गावातील पोलीस पाटील आप्पासाहेब कदम जालिंदर कदम दीपक कदम दत्ता कदम अर्जुन वाघ सचिन कदम गोविंद कदम दादाभाऊ कदम गोवर्धन वाघ सोमनाथ लांडे बबलू कदम निखिल कदम राहुल शिंगाडे आप्पासाहेब वाघ विष्णू वाघ सखाराम कदम शालेय समिती अध्यक्ष संतोष जगताप यांचा सत्कार करण्यात आला.सर्व उपस्थितांचे आभार सखाराम कदम यांनी मानले

उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप

पिंपळवंडी । प्रतिनिधी

शिवसेनाप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील केंद्रीय जि.प.शाळेत शिवसेना पाटोदा उपतालुकाप्रमुख अशोक तात्या पवार यांच्या वतीने दि.२७/७/२०२४ शनिवार रोजी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.यावेळी माजी सरपंच ज्ञानेश्वर पवार,उपसरपंच विलास पटवा,पत्रकार बबनराव उकांडे, भाऊसाहेब पवार, के.टी.पवार तसेच महादेव शहाणे, शिवाजी पवार, कृष्णकांत कुलकर्णी, बापूराव पवार,गोरख क्षिरसागर, मुख्याध्यापक शहाजी येवले सर, सहशिक्षक रमेश पवार सर, कैलास ननवरे सर,लोंढे मॅडम,क्षिरसागर मॅडम, घोडके मॅडम तसेच अंगणवाडी शिक्षिका शहाणे,इंगळे मदतनीस दगडे, वाघमारे सह विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस सामाजिक सलोखा सप्ताह म्हणून साजरा

परतूर । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभाग जालना जिल्ह्याच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस सामाजिक सलोखा सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला.

दि २२ ते २८ जुलै २०२४ पर्यंत विविध उपक्रम राबविण्यात आले. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनानुसार आणि जालना जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांच्या नेतृत्वामध्ये रक्तदान शिबिर, विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण कार्यक्रम बौद्ध विहारांमध्ये बोधी वृक्षाचे रोपण मदरसे आणि ईदगाह मध्ये अल्पसंख्यांक अध्यक्ष शालम खान यांच्या नेतृत्वात वृक्षारोपण

करण्यात आले.परतुर येथे सामाजिक न्याय सलोखा या विषयावर सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे यांनी परखड व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी परतुर तालुका अध्यक्ष संतोष आखाडे, ओबीसी सेलचे पदाधिकारी लिंबाजी आढे, इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी जय सेवालाल वस्तीग्रहामध्ये विद्यार्थ्यांना भोजनदान करण्यात आले. विविध कार्यक्रमांचे आयोजन अतिशय उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमास सुंदर खंदारे, सुभाष भदर्गे, मिलींद मगर, सचिन घुगे, आनद वाकळे, वैभव येडे, कपिल आखाडे इत्यादी कार्यकर्ते या कार्यक्रमास सहभागी झाले.

पंकजा मुंडे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

चौसाळा । प्रतिनिधी

लोकनेत्या मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रियदर्शनी शिक्षण प्रसारक मंडळ, चौसाळा चे सचिव तथा जिल्हा परिषद सदस्य माननीय अशोक शेठ लोढा यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले त्याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य भीमराव अण्णा विधाते ग्रामपंचायत सदस्य असलम शेख, ग्रामपंचायत सदस्या शमशाद शेख, ज्येष्ठ पत्रकार एन टी वाघमारे, विकास नाईकवाडे ,अमोल तांदळे तसेच पालक सुजाऊदिन मुजावर,मजहर कुरेशी, आजाउद्दीन शेख, मेघनाथ चौधरे,संजय नाडे महादेव चौधरे, सौ. माया विधाते, मैमिदा शेख, सना शेख, डॉक्टर शेंडगे तसेच शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद शिक्षिका उपस्थित होत्या माननीय लोकनेते पंकजाताई मुंढे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या त्याप्रसंगी डॉक्टर शेंडगे साहेबांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले व शालेय साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री. महामुनी सर यांनी केले व आभार शाळेचे मुख्याध्यापक श्री. रिठ्ठे सर यांनी मानले व कार्यक्रम संपन्न झाला.

दिंद्रुडच्या निजामकालीन आठवडी बाजारात पावसामुळे व्यापाऱ्यांसह ग्राहकांना मनस्ताप ; रिमझिम पावसाने बाजारातील रस्त्यावर घसरगुंड्या

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मोठे रहदारीचे ठिकाण असलेल्या दिंद्रुड गावाला माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत उपबाजार पेठ म्हणून ओळखले जाते. सर्वांत मोठी बाजारपेठ असलेल्या दिंद्रुड च्या निजामकालीन आठवडी बाजारात सततच्या रिमझिम पावसामुळे घसरगुंड्या, चिख-चिख रस्ता झाल्याने व्यापाऱ्यांसह ग्राहक मनस्ताप सहन करावा लागतो आहे. येथील शासकीय धान्य गोडाऊन परिसरात नित्यनेमाने रविवारी भरत असलेल्या

> तीस वर्षांपासून दिंद्रुड चा आठवडी बाजारात चलवून आम्हाला सांभाळले. त्यानंतर मी पंधरा वर्षांपासून दिंद्रुड चा आठवडी बाजार करतो. आदि वस्तू आम्ही बाजारात विक्रीसाठी ठेवतो. यावरच आमचे कुटुंब चालते. मात्र येथील बाजारात कोणत्याही सुविधा नसल्याने प्रत्येक पावसाळ्यात जागेत व रस्त्यावर घसरगुंड्या चिख-चिख होत असल्याने मनस्ताप सहन करावा लागतो.

आठवडी बाजारात भिज पावसाने बाजारातील रस्ते चिखलमय झाल्याने काल दि.२८ रविवारी ग्राहकांना रहदारीस मोठा अडथळा निर्माण होत असून त्रास सहन करावा लागत आहे.

मागील दहा-पंधरा दिवसांपासून पडत असलेल्या रिमझिम पावसामुळे काल रविवारी येथील बाजार परिसर सर्वत्र चिखलमय झाल्याने घसरगुंड्या, चिखलाच्या पाण्यामुळे पंचक्रोशीतील तीस-चाळीस खेड्या-पाड्यातील आठवडी बाजार करण्यासाठी आलेल्या सर्व घटकातील ग्राहकांना मानसिक त्रासाला समोर जावे लागेल. स्थानिक सह जिल्ह्यातील इतर ठिकाणांहून आलेल्या छोटचा-मोठचा व्यापाऱ्यांसह भाजीपाला, मशाला, कपडे, दाळी, खाऊचे विक्रेते अशा अनेक वस्तू विक्रीस घेऊन बसलेल्या व्यापाऱ्यांना आजूबाजूचे खडे-माती टाकून बसण्याजोगी जागा करावी लागली. तसेच ग्राहकांसाठी रस्त्यावरचा चिखल खोरे आदिच्या साह्याने उचलून बाजूला करत रस्ता तयार करावा लागला.

मोकळ्या माळरानावर विद्यार्थिनींनी फेकले एक हजार सिडबॉल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जांभूळ,सिताफळ,चिंचोके, लिंबोळ्या, व विविध बियानांचे सिडबॉल विद्यार्थिनींनी तयार केले. ते सिडबॉल मोकळ्या माळरानावर जाऊन फेकले.व वृक्षारोपणाचा आनंद द्विगुणित केला.हा उपक्रम घाटनांदुर येथे शुक्रवारी राबविण्यात आला.

येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व श्री.सोमेश्वर कन्या प्रशाला घाटनांदुर यांच्या वतीने शुक्रवारी घाटनांदूर येथे सिडबॉल उपक्रम राबविण्यात

रोटरी क्लब व सोमेश्वर कन्या शाळेचा उपक्रम

आला. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी,प्रकल्प संचालक अजित देशमुख,रोटरीचे प्रशिक्षक प्रा.संतोष मोहिते, प्रतिभा देशमुख, स्वप्नील परदेशी, सोमेश्वर कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोमटे, उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित विद्यार्थीनी व रोटरी क्लबच्या पदाधिकारी यांनी माळरानावर व मोकळ्या गायरानावर विविध बियाणांचे सिडबॉल फेकून या परिसरात वृक्ष लागवडीसाठी साठी हा उपक्रम राबविला.यावेळी संतोष मोहिते व प्रतिभा देशमुख यांनी वृक्षारोपणाचे महत्व विशद केले.

या वेळी विद्यार्थिनींना प्रा.संतोष मोहिते यांच्या वतीने खाऊचे वाटप करण्यात आले.

सीड बॉल तयार करण्याची झाली कार्यशाळा-:

श्री सोमेश्वर कन्या प्रशाला घाटनांदुर व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमानाने सोमेश्वर कन्या शाळेत विद्यार्थीनींच्या हास्ते सीड बॉल तयार करणे.माती आणि शेणाच्या मिश्रणात एक बी घालुन त्यातुन सीड बॉल म्हणजेच चिखलाचे गोळे तयार करण्यात आले.

या उपक्रमात शाळेतील १०० विद्यार्थीनींनी सहभागी झाल्या.त्यांनी प्रत्येकी १० सीड बॉल तयार केले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता जाधव, पर्यवेक्षिका एस.एस.नखाते व सर्व शिक्षक,शिक्षिका यांनी परिश्रम घेत ही कार्यशाळा घेतली.

पान ६ वरून...

राज्यस्तरीय जुनिअर तायक्वांदो

- नॅन्सी सिंग पुणे, विधी गोरे रत्नागिरी, तंझीला अख्तर नंदुरबार, स्नेहा वाघमारे कोल्हापूर

६८ किलो आतील मुली - सिद्धी बेंडाळे पुणे, दिती सातोपे मुंबई उपनगर, अनुष्का काळे चंद्रपूर, संस्कृती नागे अकोला

६८ किलो वरील मुली - आर्या शिंदे पुणे, आर्या ओटवकर ठाणे, सुहानी धनल कोल्हापूर, आदिती राहटे मुंबई

यावेळी स्पर्धेला सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे, नगरसेवक शुभम धुत , शुभम कातांगळे, सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य श्री खोड सर, मुख्याध्यापक सचिन पवार ,प्राचार्य देवेंद्र भाकरे ,आयोजन समितिचे अध्यक्ष नितिन कोटेचा , क्रीडा अधिकारी अनिकेत काळे व धनेश करांडे यांनी स्पर्धेला भेट देऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अविनाश बारगजे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शकील शेख, डॉक्टर विनोदचंद्र पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

काजू मंडळाला २ कोटी ४० लाखांचा निधी

पुणे : राज्यातील काजू फळपीक विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य काजू मंडळाला दोन कोटी ४० लाख रुपयांचा निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच काजू मंडळावर काजू क्षेत्रातील स्वतंत्र संचालक म्हणून डॉ. परशराम पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कोकण, आजरा, चंदगड आणि राधानगरी तालुक्यांसाठी काजू फळ पीक विकास योजनेंतर्गत स्थापन केलेल्या महाराष्ट्र राज्य काजू महामंडळासाठी यंदाच्या आर्थिक वर्षासाठी १२ कोटी रुपये भागभांडवल स्वरूपात अर्थसंकल्पीय तरतूद केली आहे. यापैकी २ कोटी रुपयांची रक्कम वितरणास मान्यता दिली आहे. वास्तविक भांडवली खर्चाकरिता ५० कोटी रुपयांना या आधीच मान्यता दिली आहे. मात्र, केवळ १२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. काजू मंडळाचे रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि चंदगड येथे विभागीय कार्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. मात्र, राज्यातील काजूचे उत्पादन रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात जास्त होते. सिंधुदुर्गातील वेंगुर्ला येथे काजू संशोधन केंद्रही आहे. त्यामुळे येथेच मुख्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आधी हे मुख्यालय वाशीतील पणन मंडळांच्या विकिरण केंद्रात स्थापन करण्यात आले होते.

पणन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली हे महामंडळ कार्यरत असून मुख्य कार्यकारी अधिकारी या मंडळाचे सदस्य सचिव आहेत. स्वतंत्र संचालकांमध्ये काजू प्रक्रिया उद्योजक दोन, सहकारी काजू प्रक्रिया प्रकल्प महासंघाचा प्रतिनिधी आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील काजू प्रक्रिया तज्ज्ञ यांचा एक प्रतिनिधी असे चार सदस्य नेमण्यात येणार होते. मात्र, यापैकी केवळ डॉ. परशराम पाटील यांची नियुक्ती केली आहे. या मंडळातर्फे काजूचा ब्रँड तयार करणे, जी आय मानांकनाचा विस्तार, मंडळाची वेबसाइट, प्रशिक्षण, उद्योग उभारणीस चालना, बी उपलब्धता, उपपदार्थ निर्मितीस चालना, देशांतर्गत व्यापारास चालना, काजू उत्पादक, विक्रेते, प्रक्रियादार, ग्राहक, निर्यातदारांची नोंदणी आदी कामकाज करणे अपेक्षित आहे. १६ फेब्रुवारी, २०२३ च्या निर्णयानुसार या मंडळाला ५० कोटी रुपयांचे भागभांडवल देण्याचा निर्णय झाला आहे. यापैकी अर्थसंकल्पात १२ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. त्यातील २. ४० कोटी रुपयाच्या वितरणास मान्यता दिली आहे.

भारतीय कृषी संशोधन संस्थेने विकसित केला रोबोटिक फवारणी पंप

पुणे : ग्रीनहाऊसमध्ये रासायनिक फवारणी करताना शेतकऱ्यांना त्याचा त्रास होतो. विषारी पदार्थ किंवा अवशेष श्वास घेताना त्रास होतो. यावर उपाय शोधत भारतीय कृषी संशोधन संस्थेचे (आयएआरआय) शास्त्रज्ञ दिलीप कुशवाह यांनी रोबोटिक फवारणी यंत्र विकसित केलं आहे. या यंत्रातून केवळ ग्रीनहाऊसमधील फवारणी करता येणार आहे. अलीकडेच आयएआरआयचा स्थापन दिवशी प्रदर्शन आयोजित करण्यात आलं होतं , त्यामध्ये या यंत्राचा समावेश होता. यासाठी १ लाख रूपये खर्च आला आहे. तसेच काही काही खाजगी कंपन्यांनी रोबोटिक फवारणी यंत्रात स्वारस्य असल्याचे कुशवाह म्हणाले.

या यंत्राची पाणी साठवण क्षमता ४० लीटर आहे. तसेच फवारणी करताना ग्रीनहाऊसमधील रोपांच्या उंचीनुसार तडजोड यंत्र करू शकतं. कारण यामध्ये विशिष्ठ सेन्सर बसवण्यात आले आहे. त्यामुळे फवारणीचं नोजल स्वयंचलितपणे काम करू शकतं. तयासाठी ग्रीनहाऊसच्या बाहेरून ऑपरेटर रिमोट कंट्रोलच्या मदतीने यंत्रावर नियंत्रण ठेवावं लागतं. रिमोट पॅनलवर स्क्रीन दिली आहे. त्यामुळे त्यातून फवारणी कुठे आणि किती प्रमाणात केली जात आहे, याची माहिती मिळते, असे कुशवाह म्हणाले. शेतकऱ्यांना या तंत्रज्ञानाचा फायदा होऊ शकतो. यामध्ये एक बॅटरी बसवण्यात आलेली आहे. बॅटरी पूर्ण चार्ज असेल तर २ तासात सुमार एक एकर क्षेत्रावरील फवारणी करता येते. यंत्राची बॅटरी चार्ज केली की, २ तास काम करता येते. यामध्ये बॅटरीची क्षमता आणखी वाढवता येऊ शकते. याबद्दल कुशवाह म्हणाले, ''पारंपरिक बॅटरीवर चालणाऱ्या नॅपसॅक फवारणी पंपाच्या तुलनेत रोबोटिक फवारणी यंत्र किटकनाशकांच्या वापरात ५७ टक्के बचत करते. असा दावाही कुशवाह यांनी केला आहे. रोबोटिक फवारणी यंत्रात टेलेरोबोटिक टार्गेट-स्पेसिफिक सिलेक्टिव्ह पेस्टिसाइड ऍप्लिकेटर फॉर ग्रीनहाऊस आणि ओपन-फील्ड नावाचं तंत्रज्ञान बसवण्यात आलेले आहे. दरम्यान, ग्रीनहाऊसमध्ये फवारणी करताना अनेकांना विषबाधा होते. तसेच त्याचा शरीरांवर दुष्परिणाम होतो. त्यामुळे या प्रकारच्या नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा. जेणेकरून शेतकऱ्यांना त्याचा वापर करणं सोप्पं होईल, असं जाणकार सांगत आहेत.

जनावरांचे गोचीड आणि माशापासून संरक्षण करण्यासाठी सोपे उपाय

पावसाळा सुरू झाला की गोठ्यात जनावरांना माशा आणि गोचीड यांचा त्रास मोठ्या प्रमाणात होतो. जनावरांमध्ये काही महत्वाचे जीवघेणे रोग पसरविण्यास गोचीड कारणीभूत आहेत तसेच ते जनावरांची उत्पादन क्षमता सुद्धा कमी करतात. चावणाऱ्या माशामुळे जनावरात सुर्रा ताप सारखे रोग पसरतात. यामुळे जनावरामध्ये अशक्तपणा येतो. गोचीड आणि चावणाऱ्या माशा जनावरांना प्रचंड अस्वस्थ करतात, जनावरांना एलर्जी सुद्धा होते. या लेखात जाणून घेऊ या गोचीड आणि माशा यांचे नियंत्रण करण्याचे सोपे उपाय.

गोचीड नियंत्रण उपाय : नवीन खरेदी केलेल्या कोणत्याही प्राण्याला इतर प्राण्यांमध्ये मिसळण्यापूर्वी त्यांच्या शरीरावरील संपूर्ण गोचीड काढलेले आहेत याची खात्री करावी.

जनावरांवर वेळोवेळी गोचीड मारणाऱ्या ॲकेरिसाइडचा वापर करा. गोचीड सुमारे ३००० अंडी घालते आणि अळ्या २-७ महिन्यांपर्यंत आहाराविना जगू शकतात. त्यामुळे गुरांच्या गोठ्यातील सर्व भेगा आणि खड्डे यामध्ये ॲकेरिसाईडची फवारणी करावी. थोडी सावधगिरी बाळगून फ्लेम गनद्वारे गोचीड जाळू शकता. एकच एक गोचीड नियंत्रक औषधाची फवारणी केल्यास त्यांच्या प्रतिकार क्षमता विकसित होऊ शकते त्यामुळे आलटून पालटून वेगवेगळ्या ॲकेरिसाइडचा वापर करावा. योग्य अएॅकेरिसाइड आणि त्याच्या डोसबद्दल पशुवैद्यकाचा सल्ला घ्या.

चावणाऱ्या माशा नियंत्रण उपाय :खत आणि मूत्र विल्हेवाट यांची नियमितपणे गोठ्यापासून योग्य अंतरावर विल्हेवाट लावावी. पाणी वाहून जाणाऱ्या ड्रेनेजची योग्य दुरूस्ती करायला हवी. कडूनिंबाची पाने गोठ्यात संध्याकाळी जाळून धूर करावा यामुळे माशांचा उपद्रव कमी करण्यास मदत होईल. फ्लाय रिपेलंट्स यांचा वापर करावा. कडुलिंबाचे तेल अधिक फायदेशीर : कडुलिंबाचे तेल हे चावणाऱ्या माश्या आणि गोचीड यांच्यासाठी नैसर्गिक रिपेलंट्स म्हणून कार्य करते. हे नैसर्गिक असल्यामुळे कोणतेही हानिकारक परिणाम होत नाहीत. याचा वापर नेहमी केसांच्या दिशेच्या विरूद्ध केला पाहिजे आणि संपूर्ण शरीर, विशेषतः पोट आणि पाय यावर याचा वापर केला पाहिजे.

दिन विशेष

जागतिक दिवस
जागतिक व्याघ्र दिन
विषमता विरोधी दिन

महत्वाच्या घटना

१८५२ : पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर कँडी यांच्या हस्ते विश्रामबागवाड्यात स्त्रीशिक्षणाचे भारतीय उद्गाते म्हणून जोतीबा फुले यांचा सन्मान करण्यात आला.
१८७६ : फादर आयगेन ला फॉन्ट आणि डॉ. महेन्द्र सरकार यांनी 'इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स' या संस्थेची स्थापना केली.
१९२० : जगातील पहिली हवाई टपाल सेवा अमेरिकेतील न्यूयॉर्क ते सानफ्रान्सिस्को या शहरांमधे सुरू झाली.
१९२१ : ॲडॉल्फ हिटलर नॅशनल सोशलिस्ट जर्मन वर्कर्स पार्टीचे नेते बनले.
१९४६ : टाटा एअरलाइन्सचे 'एअर इंडिया' असे नामकरण करण्यात आले.
१९४८ : दुसऱ्या महायुद्धामुळे पडलेल्या १२ वर्षांच्या खंडानंतर लंडन येथे १४ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९५७ : 'इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी एजन्सी 'ची स्थापना झाली.
१९८५ : मल्याळम लेखक टी. एस. पिल्ले यांना ज्ञानपीठ पुरस्कार
१९८७ : भारताचे पंतप्रधान राजीव गांधी व श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष जे. आर. जयवर्धने यांनी भारत-श्रीलंका शांतता करारावर सह्या केल्या.
१९९७ : कलकत्त्याच्या वंगीय साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणार्या साहित्यिक हरनाम घोष स्मृतीचिन्हासाठी दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांची निवड. अखिल भारतीय स्तरावरील हा पुरस्कार मराठी साहित्यिकास प्रथमच मिळाला.
२०२१ : आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक रशियन मॉड्यूल नौकाच्या इंजिनातील बिघाडानंतर तात्पुरते नियंत्रणाबाहेर गेले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८३ : बेनिटो मुसोलिनी इटलीचा हुकूमशहा (मृत्यू: २८ एप्रिल १९४५)
१८९८ : नोबेल पारितोषिक विजेते भौतिकशास्त्रज्ञ इसिदोरआयझॅक राबी यांचा जन्म.
१९०४ : जहांगीर रतनजी दादाभॉय तथा 'जे. आर. डी. टाटा' भारतरत्न, उद्योगपती व वैमानिक, भारतीय नागरी विमान वाहतुकीचे जनक (मृत्यू: २९ नोव्हेंबर १९९३)
१९२२ : ब. मो. पुरंदरे इतिहासकार आणि लेखक, शिवशाहीर
१९२५ : शि. द. फडणीस व्यंगचित्रकार
१९३७ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ डॅनियेल मॅकफॅडेन यांचा जन्म.
१९५३ : अनुप जलोटा भजनगायक
१९५९ : संजय दत्त अभिनेता व गुन्हेगार
१९८१ : फर्नांडो अलोन्सो स्पॅनिश रेस कार ड्रायव्हर

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२३८ : बाल्बिनस रोमन सम्राट (जन्म: १६५)
११०८ : फिलिप (पहिला) फ्रान्सचा राजा (जन्म: २३ मे १०५२)
१७८१ : योहान कीज जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (जन्म: १४ सप्टेंबर १७१३)
१८५६ : मधे विधवा विवाहाचा कायदा आला. (जन्म: २६ सप्टेंबर १८२०)
१८९० : व्हिन्सेंट व्हॅन गॉग डच चित्रकार (जन्म: ३० मार्च १८५३)
१८९१ : इश्वरचन्द्र विद्यासागर बंगाली समाजसुधारक, तत्त्वज्ञ, लेखक, शिक्षणतज्ञ व उद्योजक. यांच्या प्रयत्नांमुळेच
१९०० : इटलीचा राजा उंबेर्तो पहिला यांचे निधन.
१९८७ : भारतीय लेखक, कवी आणि नाटककार बिभूतीभूशन मुखोपाध्याय यांचे निधन. (जन्म: २४ ऑक्टोबर १८९४)
१९९४ : नोबेल पारितोषिक विजेती ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ डोरोथीक्रोफूट हॉजकिन यांचे निधन.
१९९६ : अरुणा असफ अली स्वातंत्र्यसेनानी. ९ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर तिरंगा फडकवला होता. लेनिन शांतता पुरस्कार, इंदिरा गांधी शांतता पुरस्कार, पद्मविभूषण, आंतरराष्ट्रीय सद्भावना पुरस्कार, भारतरत्न (मरणोत्तर) इ. पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: १६ जुलै १९०९)
२००२ : सुधीर फडके ऊर्फ 'बाबूजी' गायक व संगीतकार (२५ जुलै १९१९)
२००३ : बद्रुद्दीन जमालुद्दीन काझी उर्फ 'जॉनी वॉकर' विनोदी अभिनेता (जन्म: ११ नोव्हेंबर १९२६)
२००६ : डॉ. निर्मलकुमार फडकुले मराठी संत साहित्यातील विद्वान (जन्म: १६ नोव्हेंबर १९२८)
२००९ : महाराणी गायत्रीदेवी जयपूरच्या राजमाता (जन्म: २३ मे १९१९)
२०१३ : भारतीय क्रिकेटरपटू मुनीर हुसेन यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९२९)

कापूस पिकातील बोंड अळी नियंत्रण

कापूस पिकातील गुलाबी बोंडअळी नेमकी काय आहे, तिचा प्रादुर्भाव कशामुळे होतो, तिचा प्रसार कसा होतो, तिची लक्षणे काय आहे आणि बोंड अळीच्या रासायनिक नियंत्रणासाठी काय उपाय योजना आहेत याबद्दल सविस्तर माहिती असल्यास त्यावर नियंत्रण ठेवता येते. कपाशीवर मावा, तुडतुडे, फुलकिडे, बोंडअळी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो. बोंड अळीच्या व्यवस्थापनासाठी २००२ मध्ये बीटी जनुक असलेल्या वाणांचा वापर भारतामध्ये सुरू झाला परंतु बोंड अळीचा प्रादुर्भाव बीटी कपाशीवर सुद्धा दिसून येत आहे. शेतकरी मित्रांनी वेळेवर उपाययोजना केल्यास बोंड अळीचा प्रादुर्भाव पासून होणारे संभाव्य नुकसान कमी करता येईल. कापूस पिकात मुख्य ठिपक्याची बोंड आळी, अमेरिकन (हिरवी) बोंडअळी ,गुलाबी बोंड आळी या तीन बोंड अळ्यांचा प्रादुर्भाव असतो.

बोंड अळीचा प्रकार : ठिपक्याची बोंड अळी - ३० ते ६५ दिवस (पिकांवर येण्याचा कालावधी) अमेरिकन बोंड अळी - ४५ ते ८५ दिवस (पिकांवर येण्याचा कालावधी) रोटरी गुलाबी बोंड अळी - ७५ ते ११० दिवस (पिकांवर येण्याचा कालावधी)

जीवनक्रम व ओळख : अंडी आकाराने चपटी व १ मि.मी. लांब असून रंगाने मोत्यासारखी चकचकीत पांढरी असतात व ती फुले, बोंड, देठ व कोवळ्या पानांच्या खालील बाजूस दिसून येतात. अंडी अवस्था सुमारे ३ ते ५ दिवस राहते व या पक्व झालेल्या अंड्यातून सफेद रंगाची १ मिमी. लांब व डोके तपकिरी असलेली अळी बाहेर पडते. पूर्ण वाढ झालेली अळी सुमारे ११ ते १३ मि.मी. लांबट असून प्रत्येक वलयावर गुलाबी पट्टा असतो व तो नंतर शरिरावर पसरतो त्याने अळीचे शरीरगुलाबी दिसते. अळी अवस्था सुमारे ८ ते २१ दिवसांच्या दरम्यान असते. कोषावस्था मध्ये अळी लालसर तपकिरी रंगाची दिसते व सुमारे ८ ते १० मि.मी. लांब असते. तसेच कोषावस्था सुमारे ६ ते २० दिवस राहते व त्यातून

पतंग बाहेर येतात. पतंगाची लांबी सुमारे ८ ते ९ मि.मी.असते व ते करड्या रंगाचे दिसतात. पतंगाच्या पुढील पंखावर काळसर पट्टे दिसतात व पाठीमागील पंख पतंगावस्था सुमारे ५ ते ३१ दिवस राहते.

प्रादुर्भावाची कारणे : देशी जातीच्या तुलनेने अमेरिकन जातींवर जास्त प्रादुर्भाव. दीर्घकाळ वाढणाऱ्या संकरित वाणाची लागवड केल्याने बोंड अळीच्या वाढीसाठी सतत पोषक वातावरण निर्माण होते. कपाशी बरोबरच भेंडी,अंबाडी,जास्वंद,ताग इत्यादी पर्यायी खाद्याची उपलब्धता असणे. कापसाच्या विविध संकरित वाणांचा फुले येण्याचा व बोंडे लागण्याचा काळ वेगवेगळा असल्याने त्यांची लागवड केल्याने कोडीच्या वाढीसाठी सतत खाद्य पुरवठा होऊन जीवनक्रमाच्या संख्येत वाढ होणे. हंगामपूर्व तसेच हंगामी कापूस लागवड केल्याने कोडींचा जीवनक्रम वर्षभर चालू राहते. बी. टी. जनुक विरहीत कपाशीच्या ओळी न लावल्यामुळे बी. टी. प्रथिनाविरुद्ध प्रतिकारक्षमता तयार होणे. जादा उत्पादनासाठी कपाशीच्या हंगामाचा कालावधी वाढविल्याने किडीस खाद्याची उपलब्धता होणे.

पिकावर असा होतो परिणाम : अंड्यातून निघालेली अळी बोंडात शिरल्यानंतर तिच्या विष्ठेने व बोंडाच्या बारीक कणांच्या सहाय्याने छिद्र बंद करते. ज्या मुळे बोंडाचे वरुन निरीक्षण केल्यानंतर सुध्दा अळीचा प्रादुर्भाव ओळखता येत नाही. या अळीचा प्रादुर्भाव बोंडा मध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. किडलेल्या पात्या गळून पडतात किंवा अशी बोंडे परिपक्व न होता च फुटतात. गुलाबी बोंडअळी सरकीचे नुकसान करते. सरकी किडलेली असल्यामुळे बियाण्याची उगवणशक्ती कमी होते तसेच धाग्याची लांबी व मजबूतीही कमी होते.

कपाशी गुलाबी बोंड अळी नियंत्रण : प्रति एकर ८ ते १० कामगंध सापळ्यांचा वापर करावा. त्यात सापडणारी नर पतंग गोळा करून नष्ट करावेत. गरजेनुसार वेळोवेळी कामगंध सापळ्यात ल्युअर बदलून घ्यावे. कापूस साठवण केलेल्या जागी आणि जिनिंग-प्रेसिंग मिलच्या ठिकाणी प्रकाश सापळे, कामगंध सापळे लावावेत. पुढील वर्षी शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी डिसेंबर महिन्यात कपाशीच्या पऱ्हाट्या किंवा कपाशीचे शेतातील अवशेष नष्ट करावेत. त्यासाठी कापसाची शेवटची वेचणी झाल्यानंतर शेतात जनावरे चरण्यासाठी सोडून द्यावीत. उर्वरित शेंदरी बोंड अळीच्या नियंत्रणास मदत होते. डिसेंबरनंतर कपाशी पिकाचा खोडवा (फरदड) अनेक शेतकरी ठेवतात. जास्त पाणी दिल्याने कपाशीला पाते, फुले व बोंडे गुलाबी बोंड अळीच्या उपजीविकेसाठी कपाशी बोंडे उपलब्ध होत राहतात. परिणामी किडीची वाढ होत राहते. ही कीड बी. टी.ला प्रतिकारकता निर्माण करते म्हणून डिसेंबर ते १५ जानेवारीच्या आत पीक काढून टाकावे. किंवा खोडवा घेणे टाळावे. पीक काढणीनंतर कपाशीच्या पऱ्हाट्या शेतात किंवा शेताजवळ त्यांचा ढीग करून ठेऊ नये. पीक काढणीनंतर खोल नांगरणी करून जमीन उन्हात चांगली तापू द्यावी.

जैविक नियंत्रण : निम तेल १०,००० पीपीएम - २० मिली किंवा बिव्हेरिया बॅसियाना ५० मिली किंवा बॅसिल्लस थुरिंगींसिस ५० मिली प्रति १५ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

रासायनिक पद्धत : १) कराटे (लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ईसी) - १० मिली.

२) सुपर डी (क्लोरोपायरीफॉस + सायपरमेथ्रीन) - ३० मिली. ३) प्रोफेक्स सुपर (प्रोफेनोफॉस + सायपरमेथ्रीन) - ३० मिली. ४) ईएम १ (इमामेक्टीन बेंझोएट ५% एस जी) - १० मिली. ५) डेसिस १०० (डेल्टामेथ्रिन १०० ईसी) - १० मिली. ६) ट्रेसर (स्पिनोसॅड ४५ एससी.) - ७ मिली. ७) एम्पलिगो (क्लोरएन्ट्रानिलिप्रोल ०९.३०% + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ०४.६०%) - ८ मिली.

८) कोराजन (क्लोरॅनट्रानिलीप्रोल १८.५% एस. सी) - ६ मिली. या पैकी कोणतेही कीडनाशक आलटून पालटून किडीचा प्रादुर्भाव नुसार प्रति १५ लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

जयभवानीचे सहा लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट - अमरसिंह पंडित

जयभवानी सहकारी साखर कारखान्याचा रोलर पुजन समारंभ संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामाची जय्यत तयारी झाली असून या गळीत हंगामात सहा लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात येत असल्याचे प्रतिपादन जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी केले. कारखान्याचे रोलर पुजन करताना ते बोलत होते. यावेळी मच्छिंद्रनाथ गडाचे महंत ह. भ. प. जनार्धन महाराज यांच्यासह कारखान्याचे संचालक, सभासद, शेतकरी, कामगार आदी उपस्थित होते.

जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४२ व्या गळीत हंगामाचा रोलर पूजन समारंभ मच्छिंद्रनाथ गडाचे महंत ह. भ. प. जनार्धन महाराज यांच्या शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत शनिवार दि. २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता संपन्न झाला. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की, २०२३-२४ हंगामातील ११४ दिवसात ५ लाख १०१३ मेट्रिक टन ऊसाचे गाळप करून ४ लाख २०७९० पोते साखर उत्पादन झालेले आहे, ९. ४९ टक्के सरासरी साखर उतारा आलेला आहे. आसवणी प्रकल्पामधून ६२ लक्ष ८९२३७ बल्क लिटर एवढे बी-हेवी स्पिरीट उत्पादित झालेले आहे. गळीत हंगाम २०२४-२५ साठी कार्यक्षेत्रात ९१६० हेक्टर ऊसाची नोंद झाली असून त्यापासून अंदाजे ५.५० लाख मेट्रिक टन ऊस गाळपास उपलब्ध होईल तसेच बिगर नोंदीचा ११०० हेक्टर ऊस असून त्यापासून ६० हजार मेट्रिक टन ऊस उपलब्ध होणार आहे. एकूण ६ लाख १० हजार मेट्रिक टन ऊस कारखाना कार्यक्षेत्रात उपलब्ध आहे. कारखान्याने ऊस तोड वाहतूक यंत्रणेची जय्यत तयारी केलेली आहे. मागील हंगामातील ऊसाची सर्व देयके कारखान्याने अदा केली आहेत. काटकसरीने कारखाना चालविल्यामुळे ऊसाला चांगला भाव देण्यात यश आले आहे. कारखान्याची आर्थिक घडी व्यवस्थित बसल्याचे सांगताना पुढच्या हंगामतही चांगला भाव देणार असल्याची हमी अमरसिंह पंडित यांनी दिली आहे. प्रारंभी महंत जनार्धन महाराज, व जयभवानीचे जेष्ठ सभासद शिवाजीराव गोडबोले यांच्या शुभहस्ते रोलरची विधीवत पूजा करण्यात आली. यावेळी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप, यांच्यासह संचालक सर्वश्री जगन्नाथ शिंदे, आप्पासाहेब गव्हाणे, राजेंद्र वारंगे, श्रीराम आरगडे, साहेबराव चव्हाण, जगन्नाथ काळे, बाबुराव काकडे, कुमारराव ढाकणे, डॉ. विजयकुमार घाडगे, संभाजीराव पवळ, गणपतराव नाटकर, नारायणराव नवले, शंकरराव तौर, रावसाहेब देशमुख, ॲड. शरद चव्हाण, भिमराव मोरे, सुनील पाटील, संदीपान दातखिळ, जगन्नाथ दिवाण यांच्यासह हनुमान कोकणे, चंद्रकांत पंडित, भारतराव पंडित, विश्वांभर काकडे, बबनराव मुळे, गणपतराव राठोड, जयदीप औटी, फुलचंद बोरकर, विष्णुपंत घोंगडे, कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे, कार्यकारी संचालक राजेंद्र खाडप, चिफ इंजिनिअर अशोक होके, इंजि. ऋषिकेश देशमुख, मुख्य शेतकी अधिकारी जगन्नाथ शिंदे, मुख्य लेखापाल सौरभ कुलकर्णी, प्रॉडक्शन मॅनेजर गजानन वाळके, डिस्टलरी इनचार्ज राजेंद्र बडे, सिव्हील इंजिनिअर भालचंद्र कुलकर्णी, सुरक्षा अधिकारी एस.एन.औटे, संगणक विभागाचे धनाजी भोसले, खरेदी विभागाचे सुशांत सोळंके, हेड टाईम किपर सचिन उधे, यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, वाहतुक ठेकेदार, कामगार, कर्मचारी, अधिकारी व सभासद कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडवणी तालुक्यात चोरांचा सुळसुळाट

तिन ठिकाणी जबरी चोऱ्या एक चोर गावकऱ्यांनी पकडला

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात बाबीतांडा येथे दोन ठिकाणी तर मोरवड येथे एका ठिकाणी जबर चोरी केल्याची घटना शुक्रवार दि २६ जुलै रोजीच्या मध्यरात्री घडली आसून मोरवड येथे चोरी करत असतांना घरमालकाच्या पाळीव मांजराच्या सावधगिरीने एका चोराला पकडण्यात यश आले असून बाकी दोन ते तीन जण फरार झाल्याची घटना शनिवार दि २७ रोजी पहाटे ४ ते ५ वाजेच्या दरम्यान पकडलेल्या एका चोराला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.पोलीस स्टेशन मधूनही पोलिसांना गुंगारा देऊन पळ काढण्याचा प्रयत्न केल्या असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

वडवणी तालुक्यात चोरांनी शुक्रवारच्या मध्यरात्री चांगला धुमाकूळ घातला.यात बाबी तांडा येथील सतीश भोपु राठोड यांच्या घरातील ३९ ग्राम सोण्याचे दागीने नगदी ४० हाजार असे एकुन १ लाख १० हजार रुपये,व वंदना सर्जेराव आडे यांच्या घरातील १० ग्राम सोण्याचे दागिने नगदी ६० हजार असे एकुन १ लाख ७६ हाजार ८०० रु मुदेमाल चोरांनी चोरून नेहला.तर मोरवड फाट्यावरील दत्त मंदिर येथील पुजारी भगीरथ लक्ष्मण पवार यांच्या घरातील नगदी १४५० रु व चांदीचे दागिने ५३३० रु आसा एकुन ६८०० रु मुदेमाल चोरी गेला.मोरवड फाट्यावरील दत्त मंदिर येथील पुजारी भगीरथ लक्ष्मण पवार हे पहाटे ४:३० ते ५ वाजेच्या दरम्यान घरातील पाळीव मांजर कवाडाच्या बाहेरील दिसेने जोर जोराने ऊड्या घेऊ लागली.तेवढ्यात भगीरथ पवार हे कवाड उघडून बघताच शेजारील खोलीचे दरवाजे उघडे दिसले कपाटातील कपडेही अस्तव्यस्त दिसले.त्यांना आपल्या घरात चोरी झाल्याचा संशय आला.ते घरामध्ये जाऊन बघताच कपाटाच्या आडोशाला एक जण दडुन बसल्याचे दिसले.त्या चोराने त्यांच्यावर हल्ला करून पळून जाण्याचा प्रयत्न केला परंतु भगीरथ यांनी त्याला घट्ट मिठी मध्ये पकडून ठेवले व त्यांच्या आईने मोठ्याने आरडाओरडकेली असता सेजारी फाट्यावरील राहणारे नागरिक पळत आले असता.सर्वांनी त्याला धरून ठेवले.वडवणी पोलीस स्टेशनला फोन केला व तात्काळ पोलिसांना बोलवून पोलिसांच्या स्वाधीन केले.पकडलेला आरोपी कलीम शेख अलीम राहणार दहिफळ(चिंचोली)ता.जी बीड येथील रहिवाशी असल्याचे पोलिसांनी सांगितले.बाकी दोन ते तीन चोरटे पळून जाण्यास यशस्वी झाले.वडवणी पोलीस स्टेशन मधुन आरोपीने चोरट्याने पोलिसांना गुंगारा देत बाथरूमला जाण्याचे बहाना सांगत पोलीस स्टेशन च्या साईडच्या भिंतीवरून उडी मारून चित्रपटातील सीन सारखा चोर पुढे पोलीस मागे चोराने पोलिसांना चकवा देत शेजारील नदीच्या पुलाखाली दडून बसला चोर दिसेनासा झाल्याने पोलीस परेशान झाले.पुला खालच्या नळीतून अचानक पळून जाताना पोलिसांना दिसताच त्याला पकडले असल्याची बातमी वडवणीत पसरली.

राज्यस्तरीय जुनिअर तायक्कांदो स्पर्धेत पुणे संघाला विजेतेपद

यजमान बीडच्या खेळाडूंना ४ रौप्यपदके

बीड । प्रतिनिधी

तायक्कांदो असोसिएशन ऑफ बीड या संघटनेचे क्रीडा क्षेत्रात फार मोठे योगदान असून डॉ. अविनाश बारगजे यांनी या खेळासाठी स्वतःला वाहून घेतले आहे. येणाऱ्या काळात जिल्हा संघटनेला सहकार्य करू असे प्रतिपादन डॉ. सारिका क्षीरसागर यांनी केले. रत्नागिरीची रिया मयेकर मुलींमध्ये तर अमरावतीचा प्रथमेश माकनर यांना सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबईच्या मान्यतेने तायक्कांदो असोसिएशन ऑफ बीडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ३४ व्या महाराष्ट्र राज्य जुनिअर तायक्कांदो स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते पार पडला, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण , जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नितिन कोटेचा, डॉ. ईलीयस खान, ॲड शफिक शेख, समाज कल्याण अधिकारी प्रमोद सानप, शासनाचे स्पर्धा निरीक्षक क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबईचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, महासचिव मिलिंद पठारे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रवीण बोरसे, कोषाध्यक्ष व्यंकटेश करारा, सतिश खेमसकर, नीरज बोरसे आदी उपस्थितीत होते. क्योरोगी प्रकारात पुणे संघाने १४ सुवर्ण पदके जिंकून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले, रत्नागिरी संघाने ३ सुवर्णपदके जिंकून स्पर्धेचे उपविजेतेपद तर मुंबई उपनगर संघाने स्पर्धेचे तिसरे स्थान पटकावले. पुमसे प्रकारात मुंबई उपनगर संघाने ३ सुवर्ण पदके जिंकून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. रायगड संघाने स्पर्धेचे उपविजेतेपद तर पालघर संघाने स्पर्धेचे तिसरे स्थान पटकावले. यजमान बीड खेळाडूंनी देखील चमकदार कामगिरी नोंदवत ४ रौप्यपदके आहे. यावेळी स्पर्धेला सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे, नगरसेवक शुभम धुत , शुभम कातांगळे, सैनिकी विद्यालयाचे प्राचार्य खोड, मुख्याध्यापक सचिन पवार ,प्राचार्य देवेंद्र भाकरे ,आयोजन समितिचे अध्यक्ष नितिन कोटेचा , क्रीडा अधिकारी अनिकेत काळे व धनेश करांडे यांनी स्पर्धेला भेट देऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अविनाश बारगजे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शकील शेख, डॉक्टर विनोदचंद्र पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले. दिनकर चौरे, ॲड सोमीनाथ मिसाळ, अविनाश पांचाळ, नवीद शेख, डॉ. शकील शेख अलताफ कडकाले, सचिन जायभाये, नितीन आंधळे, बन्सी राऊत, कृष्णा उगलमुगले, ऋत्विक तांदळे, मयुरेश तिवारी, ॲड महेंद्र गंडले, अनिस शेख, पारस गुरुकुदे ,देवेंद्र जोशी, रंजीत काकडे, सुदर्शन गायकवाड, तानाजी आगळे आदींनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

युवकांच्या सर्वांगीण विकासात वक्तृत्व महत्त्वाचे - रणवीर पंडित

जयभवानी ज्ञानोत्सवामध्ये वक्तृत्व स्पर्धा

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थी उत्कृष्ट नागरिक घडावा यासाठी विविध क्रीडा आणि शैक्षणिक उपक्रम राबविले जात आहेत. वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून ग्रामीण भागातही चांगले वक्ते घडतील असा विश्वास शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत शारदा ज्ञानोत्सवामध्ये वक्तृत्व स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते आयोजन केले होते.

शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेअंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. माध्यमिक विद्यालय मारफळा येथे वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन रणवीर पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, माजी सभापती श्याम मुळे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष गुलाबराव कुटे, खरेदी-विक्री संघाचे संचालक नारायण डरफे, सरपंच शरदराव कबले आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना रणवीर पंडित म्हणाले की, आदरणीय शिवाजीराव दादांनी लावलेल्या जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वटवृक्षाच्या छायेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची जडणघडण होत आहे, यातूनच अष्टपैलू व्यक्तिमत्त्व तयार व्हावेत हे दादांचे स्वप्न तर पूर्ण होईलच परंतु याही पुढे आपल्या तालुक्यातील प्रत्येक नागरिक जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळात शिक्षण घेऊन कोणत्याही ठिकाणी गेला तरी तो सन्मानाने राहील. आम्ही आज सर्वतोपरी प्रयत्न करून संस्थेतील प्रत्येक विद्यार्थी उत्कृष्ट नागरिक घडावा यासाठी संस्था स्तरावर विविध प्रकारचे उपक्रम राबवून शिक्षण देण्याचे काम करत आहोत असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठोंबरे आणि हिंगे यांनी केले तर आभार शेख यांनी मानले. कार्यक्रमाल जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, मुख्याध्यापक पवार यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी आणि स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

विशाल कदमची राज्य राखीव पोलीस दलपदी निवड

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे पाटेगाव येथील विशाल अशोक कदम यांची म्हणजेच राज्य राखीव पोलीस दल गडचिरोली येथे निवड झाली. विशाल हा वयाच्या सोळाव्या वर्षापासून मेहनत करत होता. भरती हे जिद्द डोळ्यासमोर ठेवून दिवस-रात्र अभ्यास करत होता. अहोरात्र मेहनत करीत असे रोज सकाळी ५ किलोमीटर धावत असे भरतीची तयारी करत असताना विशाल शेतामध्ये काम करत होता कधी रात्री उसाला पाणी द्यायची झाले तर वडीला सोबत रात्री शेतामध्ये जात असे. त्याला त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले. राज्य राखीव पोलीस दल भरती झाला आहे. त्याला कमांडो करिअर अकॅडमी औरंगाबाद चे संचालक उत्तम पवार सर यांनी अनमोल अशी मार्गदर्शन केले. पाटेगाव येथील हा पहिलाच राज्य राखीव पोलीस होण्याचा मन मिळवला आहे. विशालची निवड झाल्याबद्दल गावातील सर्व गावकरी मंडळी च्या वतीने विशाल चे स्वागत व अभिनंदन केले. पुढील वाटचालीस

गावातील मंडळी शुभेच्छा दिल्या. गावातील मित्रपरिवार रमेश कदम अरविंद दुबाले महेश कदम सचिन सत्यप्रेम कदम. विक्रम शिंगाडे सकाराम कदम किरण कदम अर्जुन वाघ व गावचे पोलीस पाटील आप्पासाहेब कदम जगताप विकास कदम गोकुळ कदम सुभाष कदम विष्णू वाघ अमोल आठवले महेश आठवले सोमनाथ लांडे पाटील व कदम दादाभाऊ कदम गोवर्धन वाघ नंदकुमार कदम या सर्वांच्या वतीने विशालला पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या व आनंद साजरा केला.

साठे महोत्सवासाठी पोलीस यंत्रणा सज्ज

अजिंक्य चांदणेंच्या समन्वयातून पोलीस अन्? युवकांची शांतता बैठक

बीड । प्रतिनिधी

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठेंच्या जयंतीनिमित्त बीड शहरामध्ये येत्या २९ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्याकडून आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी बीड शहरातील चांदणेवाडा येथे पोलीस प्रशासनाची शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. दरम्यान या साहित्यसम्राट गौरव महोत्सवासाठी बीड शहराची पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोनि अशोक मोदीराज,पोनि मारोती खेडकर, जयंती उत्सव समितीच्या बीड शहर अध्यक्ष सुशीलाताई

मोराळे आदी उपस्थित होते.डीपीआय प्रदेशाध्यक्ष तथा साहित्य सम्राट गौरव महोत्सवाचे समन्वयक अजिंक्य चांदणे आदी उपस्थित होते. दरम्यान पोलीस प्रशासनाच्या आग्रहाखातर अतिशय कमी वेळात शांतता बैठकीचे योग्य नियोजन करण्यात आले. दरम्यान दरवर्षी अतिशय राज्याला आदर्श निर्माण करून देता येईल. असा साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित केला जातो. हा महोत्सव साजरा करत असताना समन्वयक अजिंक्य चांदणे यांच्या कल्पकतेतून प्रेरक उपक्रम राबविले जातात हा महोत्सव साजरा करत असताना तेवढ्याच ताकतीने आणि हर्ष उल्लासात साजरा होण्यासाठी कार्यकर्ते तयारीला लागलेले आहेत. परंतु या कालावधीत हा महोत्सव अतिशय देखण्या स्वरूपात आणि शांततामय वातावरणात पार पाडणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्वजण मिळून ती काळजी घेऊन हा महोत्सव साजरा करणार आहोत. अशा विविध विषयावरती या शांतता कमिटीच्या बैठकीत चर्चा झाली. यावेळी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी आ. धोंडे यांनी धामणगाव परिसरात प्रचंड विकासकामे केली-सुदाम झिंजुर्के

कडा। प्रतिनिधी

माजी आमदार भिमराव धोंडे हे विधानसभा सदस्य असताना आष्टी तालुक्यातील धामणगाव व परिसरातील वाड्या वस्त्या करीता रस्ते, पाझरतलाव व इतर विकासकामे केली आहेत असे पंचायत समितीचे माजी सदस्य सुदाम झिंजुर्के यांनी सांगितले. तत्कालीन पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रचंड निधी उपलब्ध करून विकास कामे केली.भविष्यात उर्वरित विकास केला जाईल असे आश्वासन भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी ठिकठिकाणी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात दिले.

जनसंपर्क अभियाना अंतर्गत शनिवारी दिनांक २७ जुलै रोजी आष्टी तालुक्यातील धामणगाव व परिसरातील वाड्या वस्त्यांचा दौरा केला. आष्टी पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातील सर्व सामान्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी माजी आ. भीमराव धोंडे यांनी धामणगाव व परिसरातील वाड्या वस्त्यावर फिरून लोकांच्या भेटी घेऊन संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. जनसंपर्क अभियान दौऱ्याच्या निमित्ताने माजी आ. भीमराव धोंडे यांचे ठिकठिकाणी वाजतगाजत व तोफा वाजवुन जोरदार स्वागत करण्यात आले. आष्टी, पाटोदा, कडा, शिरूर नंतर धामणगाव परिसराचा दौरा केला. शहरात ,वाड्या, वस्त्यावर ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पुढे बोलताना सुदाम झिंजुर्के यांनी सांगितले की, माजी आमदार भिमराव धोंडे हे शांत संयमी असे नेतृत्व आहे त्यांनी ३० वर्षापुर्वी विधानसभा सदस्य असताना धामणगाव परिसरातील रस्ते, पाझरतलाव, समाजात मंदिर व इतर अनेक विकास कामे केली. त्यावेळी धामणगाव परिसरातील वाड्या वस्त्यावर जाण्यासाठी रस्तेही नव्हते. भिमराव धोंडे यांनीच रस्ते केले आहेत, उर्वरित विकास करण्यासाठी भविष्यात माजी आमदार भिमराव धोंडे यांना सहकार्य करावे, अठरा पगड जातीला बरोबर घेऊन चालणारे नेतृत्व म्हणजे भिमराव धोंडे होय. जनसंपर्क अभियानात माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या समवेत भारतीय जनता पक्षाचे युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस अजयदादा धोंडे, पं. स. सदस्य रावसाहेब लोखंडे, माजी पं. स. सदस्य अमोल चौधरी, माजी सरपंच सुदाम झिंजुर्के, शहाबुद्दीन सर, किरण नरवडे व इतर मान्यवर उपस्थित होते. धामणगाव शहरात फिरुन व्यापारी वर्गाशी संवाद साधला, संत सेना महाराज मंदिरात सदिच्छा भेट दिली. हाकेवाडी, बिरंगळ वाडी, राळसांगवी, भिल्ल वस्ती, महाजन वाडी, तिरमल वस्ती, झिंजुर्के वस्ती, वंजारवाडी, बोराडवाडी येथे भेटी दिल्या व नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. ठिकठिकाणच्या भेटी दरम्यान ग्रामस्थांनी आपल्या सार्वजनिक मागण्या केल्या.नालंदा बुद्ध विहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. तिरमली वस्तीवरील डॉ. संजय सिनाप्पा गजरे हा युवक त्यांच्या समाजातील पहिला गुरांचा डॉक्टर होण्याचे प्रशिक्षण घेतले आहे त्याबद्दल त्याचा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. धामणगाव येथील मारुती ओटे यांचे नुकतेच निधन झाले त्यांच्या कुटुंबीयांचे भिमराव धोंडे यांनी सांत्वन केले .

प्रा.डॉ. मल्हारी जाधव यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

कडा । प्रतिनिधी

दिल्ली सरकार यांच्या ओबीसी कमिशनच्या वतीने स्वतंत्रता दिनानिमित्त दिला जाणारा यावर्षीचा''जीवन गौरव पुरस्कार '' '' पुरस्कार महाराष्ट्रा मधून प्रा.डॉ. जाधव मल्हारी सैदु यांना देण्यात येणार असून ते श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालय कडा येथे वाणिज्य शाखेचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत,त्यांनी विविध विषयात संशोधन केले आहे,लेख लिहिले आहेत विविध स्पर्धा आयोजित केल्या सहभाग नोंदविला व काम केलेले आहे, प्रा.डॉ मल्हारी जाधव यांनी शैक्षणिक,सामाजिक उल्लेखनीय कामगिरी केली आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण आणि रोजगार वाढीसाठी व निर्मिती साठी हे नेहमी कार्यरत असतात. सामाजिक कार्य चालु असते नेहमी विद्यार्थी व पालक यांच्याशी त्यांचा संपर्क आणि स्नेह दांडगा आहे,गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण, समाजकारण आणि अर्थकारण या तिन्ही ची योग्य पद्धतीने सांगड घालुन शिक्षण पद्धती चालवतात विद्यार्थी प्रिय व शिस्तप्रिय शिक्षक म्हणून त्यांचा परिसरात नावलौकीक आहे.या सर्व कार्याची दखल घेऊन ओबीसी कमिशन, दिल्ली सरकार यांच्या वतीने हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे हा पुरस्कार भव्य समारंभामध्ये ओबीसी कमिशनचे चेअरमन जगदीश यादव ओबीसी कमिशन चे सचिव रणजित सिंग ()मनिका महाजन न्यायधीश, भरत झा,संदीप शर्मा,ओबीसी कमिशन सल्लागार समितीचे सदस्य अनुप चावला,संदीप महाजन यांच्या हस्ते प्रा.डॉ.जाधव मल्हारी सैदु यांना सन्मानित करण्यात येणार आहे या पुरस्काराबद्दल प्रा.डॉ.जाधव मल्हारी यांचे माजी आमदार भीमराव धोंडे साहेब डॉ.अजय (दादा) धोंडे साहेब, अँड.रत्नदीप निकाळजे, अँड. शेकडे, शिक्षण प्रसारक संस्थेचे सर्व प्रशासकीय अधिकारी प्राचार्य वनवे सर उपप्राचार्य प्रा. डॉ. धोंडे संजय शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ चे सर्व प्राचार्य, उपप्राचार्य शिक्षक सर्व कर्मचारी अभिनंदन केले तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात व मित्रपरिवारात कौतुक केले जात आहे.

राज्यस्तरीय जुनिअर तायक्कांदो स्पर्धेत पुणे संघाला विजेतेपद

यजमान बीडच्या खेळाडूंना ४ रौप्यपदके

बीड । प्रतिनिधी

तायक्कांदो असोसिएशन ऑफ बीड या संघटनेचे क्रीडा क्षेत्रात फार मोठे योगदान असून डॉ. अविनाश बारगजे यांनी या खेळासाठी स्वतःला वाहून घेतले आहे. येणाऱ्या काळात जिल्हा संघटनेला सहकार्य करू असे प्रतिपादन डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी केले. रत्नागिरीची रिया मयेकर मुलींमध्ये तर अमरावतीचा प्रथमेश माकनर यांना सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबईच्या मान्यतेने तायक्कांदो असोसिएशन ऑफ बीडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ३४ व्या महाराष्ट्र राज्य जुनिअर तायक्कांदो स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या हस्ते पार पडला, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी पंडित चव्हाण , जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नितिन कोटेचा, डॉ. ईलीयस खान, ॲड शफिक शेख, समाज कल्याण अधिकारी प्रमोद सानप, शासनाचे स्पर्धा निरीक्षक क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबईचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे,

महासचिव मिलिंद पठारे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रवीण बोरसे, कोषाध्यक्ष व्यंकटेश करारा, सतिश खेमसकर, नीरज बोरसे आदी उपस्थितीत होते. क्योरोगी प्रकारात पुणे संघाने १४ सुवर्ण पदके जिंकून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले, रत्नागिरी संघाने ३ सुवर्णपदके जिंकून स्पर्धेचे उपविजेतेपद तर मुंबई उपनगर संघाने स्पर्धेचे तिसरे स्थान पटकावले. पुमसे प्रकारात मुंबई उपनगर संघाने ३ सुवर्ण पदके जिंकून स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. रायगड संघाने स्पर्धेचे उपविजेतेपद तर पालघर संघाने स्पर्धेचे तिसरे स्थान पटकावले. यजमान बीड खेळाडूंनी देखील चमकदार कामगिरी नोंदवत ४ रौप्यपदके आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेत विविध वजन गटातील अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व २ कांस्यपदके विजेते खेळाडू पुढीलप्रमाणे–

४५ किलो मुले– प्रथमेश माकनर अमरावती, सार्थक भाकरे बीड, सुजल पाटील मुंबई उपनगर, पार्थ पांडे कोल्हापूर

४८ किलो मुले वजन – ओम बोरसे पुणे, सार्थक चव्हाण रत्नागिरी, आयुष सकपाल मुंबई, सिद्धार्थ हजारे कोल्हापूर

५१ किलो – यश टेकम अमरावती, अशिश फाळके मुंबई , श्रीकृष्ण गोपाळघरे पुणे , प्रणव चौधुले कोल्हापूर

५५ किलो वजन गट– आर्यन राऊत पुणे, कृष्णराज कदम मुंबई उपनगर, प्रांतीक जमगाडे नागपूर, शिवम शहाणी छत्रपती संभाजीनगर

५९ किलो वजन गट– अश्वेत जाधव पुणे, लोकेश महाजन जळगाव, प्रथम भांडारकर गोंदिया, सत्यजीत गोणुगडे कोल्हापूर

६३ किलो वजन गट – विश्वजीत वेंगाडे पुणे, ओमकार परदेशी बीड, अभिषेक पांडव कोल्हापूर, निशांत काळे नागपूर

६८ किलो – अनिरुद्ध वाघमारे पुणे ऋषिकेश बेडसे ठाणे देवराज देवधर कोल्हापूर समर्थ सकपाळ रत्नागिरी

७३ किलो वजन गट – अर्णव चव्हाण पुणे, युवराज लवटे सांगली, प्रणव पोतदार कोल्हापूर, मुजम्मील खान अकोले

७८ किलो आतील – प्रथम केशवाणी ठाणे, रितेश दाभाडे छत्रपती संभाजीनगर, रुद्राक्ष गोलार नागपूर, गोविंददेव फुले पुणे

७८ किलो वरील– शिवांक भारद्वाज पुणे, अरित्रा मोझा ठाणे, ओम बारगजे अहमदनगर, ओम अपराज रत्नागिरी

४२ किलो मुली –रिया मयेकर रत्नागिरी ,यशस्वी चव्हाण बीड, प्रगती स्वामी पुणे, मृदुला होसुर कोल्हापूर

४४ किलो मुली – त्रिशा मयेकर रत्नागिरी, अनुजा घरल कोल्हापूर, समृद्धी यादव ठाणे, अनुश्री राठोड धाराशिव

४६ किलो मुली – तनिष्का काळे पुणे ,वैष्णवी पाटील कोल्हापूर, अर्पिता रामटेके चंद्रपूर, वैष्णवी पाटील रत्नागिरी

४९ किलो वजन गट – राधा वाघमारे पुणे, प्रियंका धर्मे कोल्हापूर, शेषा जयस्वाल नागपूर, गार्गी म्हस्के मुंबई

५२ किलो मुली – मयुरी गावडे पुणे, निकिता पवार जळगाव, श्रुती कौसाले बीड, तनया शेळके छत्रपती संभाजीनगर

५५ किलो मुली – वेदश्री गावडे पुणे, नूतन पुंड अमरावती , प्रज्योती जाधव सिंधुदुर्ग, अश्रीया वस्त मुंबई

५९ किलो मुली– तनुश्री नारकर रत्नागिरी, श्रद्धा वाल्हेकर पुणे, मानसी डोळस अहमदनगर, मयुरी साळुंखे मुंबई

६३ किलो मुली

माजलगाव मतदार संघातील शेतकऱ्यांनी पिक विमा भरून घ्यावा –भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

राज्य शासनाने जाहीर केलेला एक रुपयांमध्ये पिक विमा जास्तीत जास्त शेतकऱ्याने भरून घ्यावा अशी आव्हान भाई गंगाभीषण थावरे यांनी केले आहे.

राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या खरीप हंगामातील पिकांना संरक्षण मिळावे यासाठी एक रुपया मध्ये पिक विमा ही योजना सुरू केली असून सध्याची परिस्थिती पाहता पिक विम्याची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या पिकाचा पिक विमा काढून घेणे आवश्यक आहे ३१ जुलै ही शेवटची तारीख असून या तारखेच्या पिक विमा काढून घ्यावा मराठवाड्यात देशातील पावसाच्याप्रमाणे पेक्षा खूप कमी



पाऊस झाला आहे मराठवाड्यातील धरणे अद्याप कोरडे आहेत. यामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून शेतकऱ्यांनी पिक विमा भरून आपल्या पिकांना आर्थिक संरक्षण द्यावे असे आवाहन या पत्रकात भाई थावरे यांनी केले आहे.

प्रा.ईश्वर मुंडे माजलगाव विधान सभा निवडणूक लढवणार; प्रदेशाध्यक्षांकडे केली तिकिटाची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

विधान सभा निवडणूक २०२४ साठी सर्वच पक्षांनी जोरदार मोर्चे बांधणी सुरू केलेली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस– शरदचंद्र पवार पक्षाकडून उमेदवारांची चाचपणी करण्यासाठी निष्ठावंतांशी संवाद म्हणून प्रदेशाध्यक्ष आ.जयंतराव पाटील हे राज्यभर दौरा करत आहेत.

दि.२७/७/२०२४ शनिवार रोजी राष्ट्रवादी भवन बीड येथे निष्ठावंत मेळावा व मतदार संघ निहाय उमेदवारांची चाचपणी केली. बीड लोकसभा निवडणूकीसाठी जिल्हाभर फिरून जनतेच्या पसंतीला उतरलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांची उमेदवारी

थोडक्यात हुकली होती. जिल्हा परिषद बीड अंतर्गत प्राथमिक शिक्षक,विषयतज्ज्ञ ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर सेवा करून खा.शरदचंद्र पवार यांना भेटून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेतलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात तालुकाध्यक्ष,प्रदेश सरचिटणीस पदावर चांगले काम केलेले आहे. सध्या राष्ट्रवादी कॉंग्रेस– शरदचंद्र पवार पक्षात सेवा निवृत्त अधिकारी–कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख असलेल्या प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या कडे माजलगाव विधान सभा निवडणूक २०२४ साठी उमेदवारी मागितली आहे. या वेळी मंचावर खा.बजरंग बप्पा सोनवणे, जिल्हाध्यक्ष आ.संदिपभैया क्षीरसागर,पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे,युवक प्रदेशाध्यक्ष महाबुबभाई शेख,माजी आ.सौ.उषाताई दराडे,युवती प्रदेशाध्यक्षा सक्षणाताई सलगर, किसान सेल प्रदेशाध्यक्ष कु.पुजा मोरे,सुशिलाताई मोराळे व पक्षाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते बहू संख्येने उपस्थीत होते. माजलगाव मतदार संघाचे सामाजिक समीकरण पहाता खा.शरदचंद्र पवार यांनी उच्च शिक्षित व सर्व समाजमान्य प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांना इंडीया आघाडीची उमेदवारी दिली जनतेला तगडी फाईट पहायला मिळेल.

पत्रकार मंगेश निटुरकर यांना पितृशोक

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अंकुश नगर भागात राहणारे पत्रकार मंगेश निटुरकर यांचे वडील नारायणराव निटुरकर यांचे रविवारी दुपारी हृदयविकाराच्या धक्याने निधन झाले.मृत्युसमयी त्यांचे वय ८० वर्ष होते.त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ८:३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

बीड शहरातील पत्रकार तथा बीड नगरी साप्ताहिकाची संपादक, दैनिक देशोन्नतीचे जिल्हा प्रतिनिधी तथा मराठी पत्रकार परिषद हल्ला विरोधी कृती समितीचे तालुका समन्वयक मंगेश निटुरकर यांचे वडील गेल्या काही दिवसापासून आजारी होते. त्यांचे रविवारी दुपारी हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ८:३० वाजता अंकुशनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.मृत्युसमयी त्यांचे वय ८० वर्षे होते. ते जिल्हा मध्यवर्ती बँकेत सचिव म्हणून कार्यरत होते .त्यांच्या पश्चात दोन मुले , सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी नातेवाईक मित्र आप्तेष्ट, शहरातील वकील डॉक्टर ,पत्रकार ,मोठ्या संख्येने उपस्थित होते. दैनिक राज्य लोकतंत्र परिवार मंगेश निटुरकर यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

सुदीपराव बुडूक यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पालसिंगण येथील रहिवाशी सुदीप भास्करराव बुडूक (सात्रेपोत्रेकर) (वय-५९) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने रविवारी पहाटे निधन झाले.

मुळचे सात्रापोत्रा येथील रहिवाशी असलेले सुदीपराव (देवा) बुडूक हे पालसिगंण येथे स्थायीक झाले होते. रविवारी पहाटेच्या सुमारास त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने तातडीने बीड येथे उपचारासाठी आणण्यात आले,मात्र रस्त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्यावर पालसिंगण येथील शेतात दुपारी अत्यंसंस्कार करण्यात आले. सुदीपराव बुडूक यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, नातु, भाऊ असा परिवार आहे.पुण्य नगरीचे उपसंपादक प्रभात बुडूक यांचे ते वडील होते.बुडुख परिवाराच्या दुःखात दै.लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

फोरजी इ-पॉस मशीन अंगठे घेईना... रेशन कार्डधारकासह दुकानदार परेशान

प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करावी

इ–पॉस मशीन चालु होण्याची वाट पाहण्यापेक्षा सबंधित प्रशासन विभागाने स्वस्त धान्य दुकानदारांना गहु–तांदूळ कार्ड धारकांना वाटण्याचे आदेश देऊन जेव्हा इ–पॉस मशीन चालु होईल.त्यावेळेस लाभधारक कार्ड धारकांचे अंगठे घ्यावेत, अशी लाभधारकांकडून मागणी होत आहे.

पिंपळवंडी । प्रतिनिधी

मागील आठवडयापासून रेशन दुकानावरील इ–पॉस मशीन व्यवस्थित चालत नसल्याने रेशन धान्य दुकानदाराप्रमाणे कार्डधारकही परेशान झाल्याचे चित्र पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील स्वस्त धान्य दुकानात पहावयास मिळत आहे. येथील स्वस्त धान्य दुकानात अनेकांचे फोरजी इ–पॉस मशीनवर अंगठे झालेले आहेत.परंतु,ढगाळ वातावरण आणि रिमझिम पावसामुळे इ–पॉस मशीन चालत नसल्याने कित्येक लाभार्थी मशीनवर अंगठे देण्यापासून वंचित आहेत.जुलै महिन्याचे गहू– तांदूळ धान्य दुकानात शासनाकडून उपलब्ध आहे.ते वाटप करण्यासाठी व मशीनवर अंगठे घेण्यासाठी दुकानदार सकाळीच ८ वाजल्यापासून दुकान उघडून सज्ज असतात.परंतु,मशीन चालत नसल्याने गहू–तांदूळ वाटप करण्यास अडथळा येत आहे. सकाळपासून दुकान उघडून मशीनला झटत बसलेले दुकानदार इ–पॉस मशीन चालू कधी होईल याची वाट पाहत रेशन कार्डधारक गहू–तांदूळ मिळावे म्हणून हातातले काम–धंदे सोडून तासनतास ताटकळत थांबून हेलपाटे मारताना दिसत आहेत.मशीन काही चालू होईनात अन् दुकानदारांना अंगठ्याचे ठसे घेतल्याशिवाय धान्य देता येईना.आडात आहे पण पोहऱ्यात काही येईना अशी अवस्था धान्य वितरणात झाली आहे.जुलै अखेर अंगठे झाले नाही.तर अंगठे अभावी वंचित राहिलेल्या कार्डधारकांना धान्य मिळणार नाही.अशी वंचित राहिलेल्या कार्डधारकांमध्ये भीती व्यक्त केली जात आहे.जुलै महिना अखेरपर्यंत इ–पॉस मशीन चालू झाली नाही तर रेशन कार्डधारकांना अशा परिस्थितीतही स्वस्त धान्य दुकानातून गहू–तांदूळ भेटावे याकरिता शासन प्रशासनाने पर्यायी व्यवस्था करून कार्डधारकांची समस्या दूर करावी अशी मागणी होत आहे.

गावच्या विकासासाठी येणाऱ्या निवडणुकीत सतीश घाटगेंना पाठींबा

धामणगावच्या रस्त्याचा प्रश्न लवकरच लावणार मार्गी

धामणगाव हे घनसावंगी तालुक्यातील शेवटचे गाव असून या गावाला जोडणारा मुख्य रस्ता २५ वर्षापासून अत्यंत दयनीय बनला आहे. हा रस्ता नव्याने तयार करण्यासाठी सतीश घाटगे यांनी प्रयत्न करून मंजुरी मिळवून आणली आहे. या रस्त्यामुळे शाळकरी मुले आणि शेतकऱ्यांचे मोठे हाल होत होते.

घनसावंगी । प्रतिनिधी

शिक्षण, आरोग्य आणि रस्ते या मूलभूत सुविधापासून वंचित असलेल्या श्रीपत धामणगावची जनतेमध्ये विद्यमान आमदाराविरोधात शनिवारी मोठा रोष पाहायला मिळाला. कोणत्याही पदावर नसताना सतीश घाटगे यांनी केलेल्या विकासकामामुळे धामणगावकरांनी सतीश घाटगे यांना आगामी निवडणुकीसाठी पाठींबा दिला.

समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी धामणगावात भव्य शाखा उद्घाटन कार्यक्रम पार पडला. या सोहळ्यात जमलेल्या युवा वर्गाने आपल्या गावासाठी सर्व जनतेला सतीश घाटगे यांच्या बाजूने एकत्रित करत एका प्रकारे उठाव केला . सतीश घाटगे यांचे गावात जंगी स्वागत गावकऱ्यांनी केले. सतीश घाटगे यांनी श्रीपत धामणगावाला श्रीमंत धामणगाव बनविण्याचा शब्द दिला. तसेच येणाऱ्या काळात परिवर्तन अटळ आहे. असा विश्वास दिला. नूतन शाखेतील पदाधिकारी प्रदीप शिंदे, मच्छिंद्र येले, लखन इंडे, शरद फाटकुरे , रोहिदास शिंदे, विठ्ठल शिंदे, आकाश शिंदे, भरत शिंदे, अंकुश शिंदे, अंकुश राऊत आण्णासाहेब शिंदे, युनुस शेख, मोकिंद शिंदे, अनंत शिंदे, विकास येले, अर्जुन शिंदे, गणेश शिंदे यांनी या कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला. यावेळी समृद्धी कारखान्याचे संचालक अभिजीत उढाण, राजेंद्र छल्लारे सर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव कंटुले, कामगार विभागाचे जिल्हाध्यक्ष गोविंद आर्दड, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष माधव टेहळे, भगवान तौर, हनुमान आर्दड, रमेश जाधव, बाळासाहेब बोरकर सह आदि भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

श्रावणमास निमित्त माहेश्वरी समाजाच्या वतीने अंबाजोगाई ते परळी पायी दिंडी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने श्रावण मास निमित्त दि. २८ जुले रोजी अंबाजोगाई ते परळी पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

याबाबत सविस्तर असे की, येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने गत १४ वर्षांपासून श्रावण मास निमित्त अंबाजोगाई ते परळी पायी दिंडीचे आयोजन करण्यात येते. याही वर्षी दि. २८ जुले रोजी ही पायी दिंडी संपन्न झाली. यात सहभागी भाविकांची चहापानाची सोय गिरवली येथील जयप्रकाश भुतडा यांच्यावतीने करण्यात आली. तर या मार्गावरील गोशाळेत ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोरजी मुंदडा यांच्यावतीने फराळाची सोय करण्यात आली

होती. वैद्यनाथ दर्शन झाल्यानंतर श्री महेश सेवा संघाच्या वतीने भाविकांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली. या दिंडीत एकूण १०० भाविकांनी सहभाग घेतला. यावेळी माहेश्वरी समाजाचे जिल्हाध्यक्ष ॲड श्रीकिशन तोष्णीवाल, जिल्हा सचिव जगदीश जाजू, तालुकाध्यक्ष दत्तप्रसाद लोहिया, युवा अध्यक्ष किरण भन्साळी, युवासचिव प्रीतम तापडिया, तालुका सचिव सतीश तोष्णीवाल, महिला अध्यक्ष सौ. शिवकन्या रांदड, महिला सचिव सौ. भन्साळी यासह समाजाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. ही दिंडी यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी महिला संघटन व माहेश्वरी युवा संघटनेने सहकार्य केले.

धनादेश अवमानाच्या प्रकरणातून आरोपीची निर्दोष मुक्तता

अंबाजोगाई प्रतिनिधी

अंबाजोगाई – पाच लाख ऐंशी हजारांचा धनादेश अनादरीत झाल्याच्या आरोपातून परळी फौजदारी न्यायालयाने बालासाहेब रावसाहेब वाव्हळे यांची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड.आर.एस. डिघोळे यांनी प्रभावी युक्तिवाद केला.

सदर प्रकरणाची अधिक माहिती अशी की, फिर्यादी मारोती माणिक गुट्टे यांनी सन २०२१ साली पाच लाख ऐंशी हजार रूपायाचा धनादेश अनादरित झाल्याने बालासाहेब रावसाहेब वाव्हळे यांचे विरूध्द परळी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात एस.एस.सी. क. ६०९/२०२१ अन्वये कलम १३८ एन. आय. ॲक्ट अन्वये फौजदारी प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरणात उभय पक्षकारांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या पुराव्यावरून व उभय पक्षकारांच्या विधिज्ञांनी सादर केलेला अंतिम युक्तीवाद ऐकून प्रथमवर्ग न्या. एस. बी. गणप्पा यांनी बालासाहेब रावसाहेब वाव्हळे यांची सदर धनादेशाच्या फौजदारी प्रकरणातून दि. १९ जुलै २०२४ रोजी निर्दोष मुक्तता केली. सदर फौजदारी प्रकरणात बालासाहेब रावसाहेब वाव्हळे यांच्या वतीने विधिज्ञ ड. आर.एस. डिघोळे, ड. एस. आर. मुंडे, अंबाजोगाई, ड. एस. ए. सोनपीर व ॲड. आबासाहेब सोळंके, परळी वैजनाथ यांनी काम पाहिले.

ॲड. आर. एस. डिघोळे यांनी सदर प्रकरणात लेखी करारनामा व रशीद पावती असताना देखील फिर्यादीचा घेतलेला अभ्यासपूर्ण व प्रभावी उलटतपास. त्याचप्रमाणे सदर प्रकरणात सादर केलेला अंतिम युक्तीवाद व दाखल केलेले मा. सर्वोच्च न्यायालयाचे व मा. उच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे यामुळे संबंधिताची निर्दोष मुक्तता झालेली आहे. धनादेशाच्या फौजदारी प्रकरणात ड. आर. एस. डिघोळे यांची उलटतपास घेण्याची शैली व असणारा सखोल अभ्यास अतिशय उल्लेखनीय आहे.

–ॲड. एस. आर. मुंडे
विधिज्ञ, जिल्हा व सत्र न्यायालय, अंबाजोगाई

सदर प्रकरणात ऊसतोड मजूरावर झालेल्या फौजदारी प्रकरणातून त्याची निर्दोष मुक्तता झाली. वादातील धनादेश हा कायदेशीर देणे देण्याबाबत दिल्याचे सिध्द झाले नाही. त्यामुळे संबंधिताची निर्दोष मुक्तता झाली आहे. ॲड. आर. एस. डिघोळे यांनी आरोपीच्यावतीने मांडलेली बाजु व घेतलेला बचाव उल्लेखणीय आहे.

–ॲड. एम. बी. आदमाने,
उपाध्यक्ष, वकीलसंघ, जिल्हा व सत्र न्यायालय, अंबाजोगाई

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

शहरात कोयता गँगची दहशत; लोहगाव परिसरात दुकानासह वाहनांची मोठी तोडफोड

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहर परिसरात गेल्या काही दिवसांमध्ये कोयता गँगची दहशत मोठ्या प्रमाणावर वाढली होती. शहरातील अनेक भागात पोलिसांनी कारवाई देखील केली होती. मात्र आता पुन्हा एकदा शहर परिसरात कोयता गँगने दहशत घालण्यात सुरुवात केली आहे. लोहगाव परिसरात शनिवारी रात्रीच्या सुमारास कोयता गँगच्या गुंडांनी दुकानाची आणि वाहनांची तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे. इतकंच नाही, तर हातात कोयते नाचवत या गुंडांनी रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना देखील धमकावल्याचं समोर आलं आहे. या घटनेमुळे आजुबाजूच्या परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

शहरातील घडलेल्या या घटनेबाबत विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून दहशत माजवणाऱ्या आरोपींचा शोध सुरू आहे. पुणे पोलिसांनी कोयता गँगच्या गुंडांना पकडून शहरातून भररस्त्यात त्यांची धिंड देखील काढली होती. अनेक गुंडांना तडीपाराच्या नोटीसा देखील पाठवल्या होत्या. गेल्या काही दिवसांमध्ये कोयता गँगची दहशत कमी झाल्याचं दिसून येत होतं. मात्र,पुन्हा एकदा अशा घटना घडल्याने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झालं आहे.

घटनेचा व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल

या घटनेचे व्हिडिओ सोशल मिडीयावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आहेत. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये काही लोक हातात कोयता घेऊन दुकांनांची आणि दुचाकी गाड्यांची तोडफोड करताना दिसत आहे. या गुंडांना पोलिसांचा वचक राहिला नसल्याचं चित्र आता समोर आलं आहे.

मात्र, पुन्हा कोयता गँग सक्रिय होताना दिसत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात लोहगाव परिसरात शनिवारी रात्रीच्या सुमारास अचानक कोयता गँगचे गुंड आले. त्यांनी हातात कोयते घेऊन दहशत माजवायला सुरूवात केली. आम्ही इथले भाई आहे, आमच्या नादाला लागू नका, असं म्हणत परिसरातील स्थानिक नागरिकांना धमकावल्याची माहिती समोर आली आहे. कोयता गँगमधील या आरोपींनी परिसरात दहशत माजवत असतानाच दुकानांची, दुचाकी गाड्यांची मोठ्या प्रमाणावर तोडफोड केली आहे. त्याचबरोबर चेनाराम चौधरी यांच्या दुकानातही कोयता गँगच्या गुंडांनी कोयत्याने तोडफोड केल्याची माहिती समोर आली आहे. त्यांनी दुकानात तोडफोड करत धुडगूस घातला. दरम्यान, ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गुन्हा दाखल केला असून आरोपींचा शोध सुरू केला. या गुंडांना पोलिसांचा धाक उरला आहे की नाही असा प्रश्न आता स्थानिकांना पडला आहे.

पुण्यातील भाजप पदाधिकाऱ्याच्या विरोधात पनवेलमध्ये गुन्हा दाखल;

ऑर्केस्ट्रामध्ये मारहाण करून सोन्याची चेन लंपास केल्याचा आरोप

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील भाजप पदाधिकाऱ्याच्या विरोधात पनवेलमध्ये गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. पनवेल येथील एका ऑर्केस्ट्रामध्ये २ जणांना मारहाण केल्यामुळे भाजप पदाधिकाऱ्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाचताना वाद झाल्यानंतर भाजप पदाधिकारी यांनी धक्का मारून खाली पाडले आणि मारहाण केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आलेला आहे.

ज्या तरुणांना मारहाण त्यांच्या अंगावर असलेले सोने देखील लुटण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गणेश गीते यांनी या संदर्भात फिर्याद दिली आहे. आरोपी आणि फिर्यादी हे दोघे ही ऐकमेकांच्या ओळखीचे आहेत. अशी माहिती समोर आली आहे. २० जुलै रोजी फिर्यादी आणि त्यांचा मित्र पनवेल मधील एका ऑर्केस्ट्रामध्ये गेले होते. त्या

ठिकाणी आरोपी आणि त्यांचे मित्र सुद्धा त्या ठिकाणी उपस्थितीत होते. दरम्यान, मध्यरात्री १२ ते १ वाजण्याच्या सुमारास नाचत असताना आरोपी यांनी फिर्यादींना मुद्दाम धक्का दिला. फिर्यादी यांनी त्याचा जाब विचारला असता आरोपीने त्यांना मारहाण करायला सुरुवात केली. तसेच यावेळी फिर्यादी यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून असल्याचा आरोप केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आणि फिर्यादी हे दोघे ही ऐकमेकांच्या ओळखीचे आहेत. २० जुलै रोजी फिर्यादी आणि त्यांचा मित्र पनवेल मधील एका ऑर्केस्ट्रामध्ये गेले होते. त्या ठिकाणी आरोपी यांनी फिर्यादींना मुद्दाम धक्का दिला. फिर्यादी यांनी त्याचा जाब विचारला असता आरोपीने त्यांना मारहाण करायला सुरुवात केली. तसेच यावेळी फिर्यादी यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिस्कवली असल्याचा आरोप केला आहे. याप्रकरणी पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे

भरधाव लक्झरी बसची दुचाकीला धडक

पुणे । प्रतिनिधी

पुणे-सोलापूर महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. या अपघातामध्ये एका लक्झरी बसनं दुचाकीला उडवलं, या घटनेत दुचाकीवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला आहे. मळद गावच्या हद्दीमध्ये हा भीषण अपघात झाला. रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीला पाठीमागून येणाऱ्या भरधाव बसनं धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला.

पुणे सोलापूर महामार्गावरील दौंड तालुक्यातील मळद गावच्या हद्दीमध्ये रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीला पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या लक्झरी बसने धडक दिल्याने दुचाकी वरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून जात असताना घागरे वस्ती जवळील दुभाजकाच्या ठिकाणी रस्ता ओलांडत असताना हा अपघात घडला आहे. दत्तात्रेय गंगाधर यादव व त्यांच्या पत्नी सुमन यादव असं मृत व्यक्तींचं नावं आहेत. दरम्यान हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये दुचाकीचा पूर्णपणे चुराडा झाला आहे. या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

पोलीस ठाण्यांच्या आवारातील बेवारस वाहनांचा लिलाव

पुणे । प्रतिनिधी

शहरातील पोलीस ठाण्यांच्या आवारात बेवारस पडलेल्या वाहनांचा आता लिलाव केला जाणार आहे. शहारातील विविध पोलीस ठाणे आणि वाहतूक विभागात अशी सुमारे १ हजार १८६ वाहने आहेत. यात दुचाकी, चारचाकीचा समावेश आहे. वाहन मालकांचा शोध घेऊनही सापडत नसल्याने ही प्रक्रिया केली जाणार आहे.

अपघात, चोरी तसेच फसवणुकीसह इतर काही प्रकरणात पोलिसांनी कारवाई केल्यानंतर अनेकदा संबंधित वाहने जप्त केली जातात. तर, वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनांवरही कारवाई केली जाते. दंडात्मक कारवाई करून अशी वाहने सोडून दिली जातात. मात्र, गंभीर प्रकरणात सदर वाहनांवर खटला दाखल करून ती जप्त केली जातात. या वाहनांवरील कार्यवाही पूर्ण करून वाहनधारकांनी संबंधित वाहन सोडून घेणे अपेक्षित असते. मात्र, जप्त केलेली अनेक वाहने वर्षानुवर्षे सोडवली जात नाहीत.

त्यावरील कर, दंड भरला जात नाही. त्यामुळे ती वाहने पोलीस ठाण्याच्या आवारात वर्षानुवर्षे पडून असतात. शहरात पोलीस ठाण्यांच्या आवारात अशी १ हजार १८६ वाहने आहेत. अनेक वाहने वर्षानुवर्षे एकाच जागेवर असल्याने कुजली आहेत. न्यायालयातून प्रकरण खारीज केल्यानंतरही नागरिक वाहने नेत नाहीत. यामुळे पोलीस स्टेशन आवारात जागा कमी पडत आहे. त्यामुळे पोलिसांकडून या वाहनांचा लिलाव केला जाणार आहे पोलिसांनी शोध घेऊनही वाहनांचे मालक सापडले नाहीत. नागरिकांनी पाहणी करून कोणाचे वाहन असल्यास पुढील १५ दिवसांत संबंधित पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक यांच्यासमक्ष उपस्थित राहून अर्जासह गाडीची मालकी हक्क दर्शवणारी कागदपत्रे सादर करून हक्क सिद्ध करावा. अन्यथा सदरची बिनधनी वाहने शासनाच्या स्वाधीन आहेत, असे समजून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ८५ (२) मधील अधिकारानुसार वाहने लिलावात विकली जाणार आहेत.

पावसानानंतर पुण्यात डेंग्यूचे थैमान, ३८९ रुग्ण आढळले

पुणे । प्रतिनिधी

गेल्या आठवड्यात पावसाने पुणे आणि परिसरला पावसाने झोडपले आहे. यासह खडकवासला धरण प्रकल्पातील धरण क्षेत्रात अतिवृष्टी झाल्याने पाण्याचा विसर्ग गरण्यात आला होता. त्यानंत शहरात पाणी शिरल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली होती.

आता धरणांतून सोडण्यात येणार विसर्ग कमी केल्या शहरातील पाणी ओसरले आहे. मात्र, हे पाणी ओसरल्यानंतर रोगराईचे प्रमाण वाढले आहे. अशात शहरात डेग्यूचे ३८९ रूग्ण आढळल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पुण्यात पाऊसानंतर आता रोगराईने थैमान घातले आहे. दरम्यान गेल्या महिन्याभरापासून पुण्यात झिकाचे रुग्ण सापडत असल्याने चिंता निर्माण झाली आहे. झिकाच्या रुग्णांची संख्या आता ३७ वर पोहचल्याने महानगर पालिकेने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. याचबरोबर चिकनगुनियाचेही काही रूग्ण सापडल्याने चिंता निर्माण झाली आहे.

किल्ले शिवनेरीचे दरवाजे पर्यटकांसाठी बंद

जुन्नर । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांची जन्मभूमी किल्ले शिवनेरी येथे पर्यटकांना ३१ जुलैपर्यंत प्रवेशबंदी करण्यात आली असल्याची माहिती जुन्नरचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण यांनी दिली आहे. पावसाळी पर्यटनाच्या दृष्टिकोनातून नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

किल्ले शिवनेरीच्या गणेश दरवाजाच्या वरील बाजूस असलेला साधारण ७ ते ८ फूट लांब व ५ ते ६ फूट रुंदीचा खडक ढासळून किल्ल्याच्या भातखळा बाजूस खाली घसरून आला आहे. तसेच गणेश दरवाजाच्या लगत असलेली ८ ते ९ फूट लांबीची किल्ल्याची तटबंदी तुटली असल्याचे निदर्शनास आले आहे. काही दिवसांपासून जुन्नर परिसरात जोरदार पाऊस पडत आहे. त्या अनुषंगाने पावसाळ्यातील पर्यटनासाठी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दि. ३१ जुलैपर्यंत किल्ले शिवनेरी पर्यटनासाठी बंद करून पर्यटकांना किल्ल्यावर प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन न करणार्या पर्यटकांवर भारतीय वन अधिनियम १९२७, वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ व तत्सम कायदे व नियमांतर्गत कारवाई करण्याचे निर्देश उपवन संरक्षक अमोल सातपुते यांनी वनविभागाला दिले आहेत.

आंधळगावतील शेतात बिबट्याची चार पिल्ले

पुणे । प्रतिनिधी

येथील भाऊसाहेब खांडेकर यांच्या शेतात शनिवारी (ता. २७) दुपारी १२ वाजता बिबट्याचे चार बछडे आढळून आली. त्यामुळे परिसरात भीतीदायक वातावरण निर्माण झाले आहे.

या परिसरात गेल्या काही दिवसापासून नागरिकांना बिबट्याचे दर्शन होत आहे. खांडेकर यांच्या शेतातील ऊसतोडणी सुरु आहे. उसाची तोडणी करत असताना कामगारांना उसाच्या सरीत बिबट्याचे चार बछडे आढळून आले. येथील स्थानिक नागरिकांनी याबाबत वनविभागाला त्वरित माहिती दिली. वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले, मात्र चारपैकी तीन बछडे उसात शेतात निघून गेले. त्यामुळे वनविभागाने सापडलेल्या एका बछड्याला पुन्हा उसाच्या शेतात सोडून दिले.

या परिसरात उसाचे मोठ्या प्रमाणात क्षेत्र असल्याने येथे बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सातत्याने जनावरे व पाळीव कुत्र्यांना बिबट्या आपले भक्ष्य बनवत आहे. दिवसा परिसरात बिबट्याचे दर्शन होत असल्याने महिला कामगार वर्ग भयभीत झाला आहे. वनविभागाने बिबट्या पकडण्यासाठी त्वरित येथे पिंजरा लावावा, अशी मागणी नागरिक करत आहेत.

खेडकर कुटुंबियांचा नवा कारनामा;बारामतीत जमिनीच्या सातबारावरील नावात दुरुस्ती

बारामती । प्रतिनिधी

राज्यभरात चर्चेत आलेली वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर आणि त्यांच्या कुटुंबियाचे अनेक कारनामे बाहेर आले आहेत. गेल्या काही दिवसांपुर्वी पूजा खेडकरचं बारामती कनेक्शनसमोर आलं होतं. पूजा खेडकरच्या कुटुंबियांनी बारामती तालुक्यात जमीन खरेदी केली असल्याची माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी समोर आणली होती. आता त्या सातबारावरील नावात दुरुस्ती करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

दिलीप धोंडीबा खेडकर ऐवजी दिलीप कोंडिबा खेडकर असा नावात बदल करण्यात आलेला आहे. दिलीप खेडकर यांनी १४ वर्षांपूर्वी १४ गुंठे जमीन बारामती तालुक्यातील वाघळवाडी गावात खरेदी केलेली असल्याची माहिती आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी समोर आणली होती. बारामती तालुक्यातील वाघळवाडी येथे दिलीप खेडकर यांची ही जमीन विक्री करायची असल्याने त्या ठिकाणी खेडकर कुटुंबियांनी तशी पाटी लावून जमीन विकायला काढली आहे. दीड कोटी इतकी जमीनीची किंमत असल्याचे सांगितले जात आहे.

वाघळवाडी ग्रामपंचायत हद्दीत गट क्रमांक ८ मध्ये दिलीप खेडकर यांच्या नावावर जमीन आहे. पण यामध्ये नवीन माहिती समोर आली आहे. वाघळवाडी येथे असलेल्या खेडकर यांच्या ७/१२ वरती नावाची स्पेलिंग दुरुस्ती असा बदल करण्यात आली आहे. दिलीप धोंडीबा खेडकर ऐवजी आता नवीन नाव दिलीप कोंडिबा खेडकर असा नावात बदल करण्यात आला आहे. वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या खेडकर कुटुंबातील सदस्यांवर चौकश्याचा ससेमिरा लागला असताना ७/१२ वरील नोंद दुरुस्त केल्याने अगोदर नावांचा घोळ समोर आला असताना आता नव्याने ७/१२ वरील नाव बदल्याने दिलीप कोंडिबा खेडकर? आणि दिलीप धोंडीबा खेडकर? कोण की एकच व्यक्ती आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सुनीत भावे, सरचिटणीसपदी मीनाक्षी गुरव तर खजिनदारपदी शिवाजी शिंदे यांची निवड

पुणे । प्रतिनिधी

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सुनीत भावे(महाराष्ट्र टाईम्स) यांची बिनविरोध निवड झाली आहे. सरचिटणीसपदी मीनाक्षी गुरव(सकाळ), उपाध्यक्षपदी श्रीकिशन काळे(लोकमत) , चंद्रकांत फुंदे(न्यूज १८ लोकमत), खजिनदारपदी शिवाजी शिंदे(पुढारी), चिटणीसपदी सचिन गोरे(सकाळ), हिरा सरवदे(पुढारी) यांची निवड(झाली आहे.

कार्यकारणी सदस्यपदी अश्विनी केदारी(लोकमत डिजिटल), श्रीकृष्णा कोल्हे(महाराष्ट्र टाईम्स), ज्ञानेश्वर भोंडे(लोकमत), प्रसाद पवार((महाराष्ट्र टाईम्स), मिकी घई(एबीपी माझा), सुदेश मिटकर(सकाळ - सरकारनामा), अनिल खुडे(केसरी), श्रीकृष्ण पादीर(प्रभात), संजय सपकाळे(लोकसत्ता), यशवंत सिंह(भास्कर) यांची निवड झाली आहे. मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी रवीं.प्रताप परदेशी आणि सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून रवीं.स्वप्नील जोशी यांनी काम पाहिले.

लिंबारवाडी येथे दोन घरांना, जमिनीला भेग

पुणे । प्रतिनिधी

मुळशी धरण परिसरात गेले चार-पाच दिवस अतिमुसळधार पावसामुळे जमिनी खचणे, आदरवाडी येथे डोंगरातून दरड कोसळली होती. रस्ते खचणे, जमिनीला भेग पडणे, असे प्रकार समोर येत आहेत. लिंबारवाडी (ता. मुळशी) येथे जमीन खचून सुमारे पाचशे मीटर लांब भेग पडली आहे. त्यामुळे दोन घरांना भेगा पडल्या आहेत. त्यामुळे घरे धोकादायक झाल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण आहे.

दोन वर्षांपूर्वीही याच परिसरात निंबारवाडी, वाघवाडी येथे पावसाळ्यात जमिनींना मोठया भेगा पडल्या होत्या. त्यामुळे जमिनीवर असणारी घरे, गोठे यांनाही तडे गेले होते. आता या वर्षीही निंबारवाडी येथे जमिनीला भेगा पडल्या आहेत. सुमारे पाचशे मीटर लांब व फुटभर खोल भेग जमिनीला पडली आहे. या भेगेची खोली ठिकठिकाणी वेगवेगळी आहे. निंबारवाडी येथील भेगेमुळे संदीप मरगळे, रामभाऊ मरगळे यांच्या घराला तडे गेले आहेत. दोन दिवसांपूर्वी पडलेल्या या भेगा दिवसागणिक मोठ्या होत आहेत. त्यामुळे घरे कोसळण्याची शक्यता असल्याने घरे धोकादायक झाली आहेत. त्यामुळे गुरांना तिथेच बांधून ग्रामस्थ इतर सुरक्षित ठिकाणी नातेवाइकांकडे झोपण्यास जात आहेत. त्यामुळे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करून नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.



लिंबारवाडी येथे दोन घरांना, जमिनीला भेग

मुळशी धरण परिसरात गेले चार-पाच दिवस अतिमुसळधार पावसामुळे जमिनी खचणे, आदरवाडी येथे डोंगरातून दरड कोसळली होती. रस्ते खचणे, जमिनीला भेग पडणे, असे प्रकार समोर येत आहेत. लिंबारवाडी (ता. मुळशी) येथे जमीन खचून सुमारे पाचशे मीटर लांब भेग पडली आहे. त्यामुळे दोन घरांना भेगा पडल्या आहेत. त्यामुळे घरे धोकादायक झाल्याने ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण आहे.

दोन वर्षांपूर्वीही याच परिसरात निंबारवाडी, वाघवाडी येथे पावसाळ्यात जमिनींना मोठया भेगा पडल्या होत्या. त्यामुळे जमिनीवर असणारी घरे, गोठे यांनाही तडे गेले होते. आता या वर्षीही निंबारवाडी येथे जमिनीला भेगा पडल्या आहेत. सुमारे पाचशे मीटर लांब व फुटभर खोल भेग जमिनीला पडली आहे. या भेगेची खोली ठिकठिकाणी वेगवेगळी आहे. निंबारवाडी येथील भेगेमुळे संदीप मरगळे, रामभाऊ मरगळे यांच्या घराला तडे गेले आहेत. दोन दिवसांपूर्वी पडलेल्या या भेगा दिवसागणिक मोठ्या होत आहेत. त्यामुळे घरे कोसळण्याची शक्यता असल्याने घरे धोकादायक झाली आहेत. त्यामुळे गुरांना तिथेच बांधून ग्रामस्थ इतर सुरक्षित ठिकाणी नातेवाइकांकडे झोपण्यास जात आहेत. त्यामुळे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करून नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.

अतिवृष्टीच्या अंदाजामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना प्रशासनातर्फे सतर्कतेचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

अतिवृष्टीचा अंदाज दिल्यामुळे पुढील दोन दिवस मुठा आणि पवना नदीपात्रात पर्जन्यामानानुसार आणि येव्यामुळे मोठ्या प्रमाणात विसर्ग होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत खडकवासला आणि पवना धरणातून नदीपात्रात विसर्ग सुरु असून पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग पुन्हा कमी/जास्त करण्यात येईल.

उपरोक्त विषयानुसार पुणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी मुठा नदीपात्र आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी पवना नदीपात्रातील निषिद्ध क्षेत्रामध्ये उतरू नये आणि नदीपात्रात काही तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावीत. कृपया सखल भागातील संबंधित नागरिकांनी नदीपात्रात उतरू नये असे आवाहन खडकवासला पाटबंधारे विभागातर्फे करण्यात आलेले आहे.